MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक १२ / डिसेंबर २०२५

## संपादकीय

### फिनलँडमधील शालेय शिक्षण

फिनलँड हा उत्तर धृवाजवळ असलेला एक लहानसा देश आहे. या देशातील शिक्षण प्रणाली वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे ऐकले होते. बरेच लोक या देशातील शिक्षण प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी शैक्षणिक दौरे करतात. काही ठिकाणी फिनलँडच्या धरतीवर शाळा काढण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या देशाच्या शिक्षण प्रणालीबद्दल बरेच कुतूहल मनात होते. संधी मिळताच हे कुतूहल शमविण्याचा प्रयत्न केला. कार्यालयीन कामाच्या निमित्ताने सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत तीन महिने फिनलँड देशात राहण्याची संधी मिळाली. या संधीचा मी पुरेपूर फायदा करून घेतला. या देशातील शिक्षणपद्धतीची काय वैशिष्ट्ये आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. याच अनुभवावर हे संपादकीय आधारलेले आहे.

फिनलँडच्या शिक्षण प्रणालीचा अभ्यास करताना पहिल्यांदा असे लक्षात येते ते हे की त्यांनी बालशिक्षणाला खूपच महत्त्व दिले आहे. हे काम खासगी संस्थावर न सोपविता त्यासाठी सरकारने स्वतंत्र बालवाड्या काढल्या आहेत. वयाची तीन वर्षेपूर्ण झालेली मुले या बालवाडीत प्रवेश घेतात. ही मुले त्यांच्या वयाची सहा वर्षेपूर्ण होईपर्यंत बालवाडीत शिक्षण घेतात. हे शिक्षण सर्वांना मोफत दिले जाते. बालवाडीसाठी खेळ, चर्चा आणि नृत्यावर आधारित अभ्यासक्रम बनविण्यात आलेला आहे. लहान मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी या बालवाडीत विशेष प्रयत्न केले जातात. त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमले जातात. बालवाडीत तयार झालेला भक्कम पाया हा विद्यार्थ्यांच्या भावी प्रगतीला आधारभूत ठरतो.

वयाची सात वर्षेपूर्ण झाल्यानंतर मुलांना प्राथमिक शाळेत प्रवेश दिला जातो. त्याआधी एक वर्ष त्यांची तयारी करून घेतली जाते. त्याला तयारीचे वर्ष (Preparatory year) असेच म्हणतात. यातून तावूनसुलाखून निघालेले सात वर्षेपूर्ण केलेले विद्यार्थी पहिल्या वर्गात प्रवेश करतात. सहाव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षण धरले जाते. या स्तरावर वर्गाला एकच शिक्षक असतो. एकच व्यक्ती सर्व विषय शिकवते. बहुतांश सरकारी शाळा फिनिश माध्यमाच्या असतात. परंतु त्यातदेखील काही वर्ग इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणारे असतात. इंग्रजी भाषेचे जागतिक स्तरावर असलेले महत्त्व लक्षात घेता त्यांना हे बदल करावे लागले आहेत. एक भाषा म्हणून इंग्रजी शिकविली जाते. प्रत्येक

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

सुशिक्षित फिनिश व्यक्ती चांगली इंग्रजी बोलू शकते. त्यामुळे दैनंदिन व्यवहारात फारशी अडचण येत नाही. त्यांचे शब्दोच्चार जरा वेगळे असतात. परंतु थोड्याच दिवसात आपल्याला त्याची सवय होते.

शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमात प्राथमिक स्तरावर सामान्य विज्ञान, गणित, भाषा याबरोबरच नागरिकशास्त्र या विषयाला पुरेसे महत्त्व दिलेले आहे. समाजात कसे वागावे, निसर्गाचा समतोल कसा टिकवून ठेवावा, वाहतुकीचे नियम कसे पाळावेत यांचे बाळकडू मुलांना त्यांच्या प्राथमिक शिक्षणातच दिले जाते. त्यामुळे फिनिश लोकांच्या वागण्यात सौजन्य आढळून येते. एखादी व्यक्ती रस्ता ओलांडत असेल तर आपले वाहन थांबवून वाट पाहण्याची वृत्ती सर्वत्र दिसते.

इयत्ता सातवीपासून माध्यमिक स्तराचे शिक्षण सुरू होते. या स्तरावरील शिक्षणासाठी देखील राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रम तयार केलेला आहे. विज्ञानाच्या तसेच गणिताच्या विविध शाखांमधील सखोल ज्ञान मुलांना देण्याचा येथे प्रयत्न दिसतो. त्यासाठी विषय शिक्षक नेमले जातात. शिक्षणाचा भर माहिती देण्यावर नसून अनुभवातून ज्ञान प्राप्त करण्यावर आहे. त्यासाठी सुसज्ज अशा प्रयोगशाळा निर्माण करण्यात आल्या आहेत. याखेरीज शिक्षणासाठी प्रकल्प पद्धतीचा वापर केला जातो. गटागटाने मुलांनी प्रकल्प पूर्ण करावे अशी अपेक्षा असते. यातून त्यांना सवंगड्यांकडून शिकायला तर मिळतेच त्याचबरोबर सहकार्य करण्याची वृत्ती बळावते. एकविसाव्या शतकात अपेक्षित असलेल्या गुणांमध्ये सहकार्य हा एक महत्त्वाचा गुण धरला जातो.

शालेय शिक्षणाचा महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. शालेय अध्यापन प्रभावी होण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण चांगल्या तऱ्हेने होणे आवश्यक आहे. या संदर्भात फिनलँडने आघाडी घेतल्याचे दिसते. देशातील बहुसंख्य विद्यापीठात शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. हेलसिंकी विद्यापीठाच्या शिक्षण विज्ञान (Educational Sciences) या विभागाला भेट देण्याची मला संधी मिळाली. या विभागात शैक्षणिक मानसशास्त्र शिकविण्याची सोय आहे तसेच शिक्षकांना प्रयोग करण्यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा आहे. येथे विज्ञानातील प्रयोगाबरोबरच शिवणकाम, वेल्डिंग, लाकूडकाम अशी कौशल्ये शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. सेवापूर्व प्रशिक्षणाबरोबरच सेवांतर्गत प्रशिक्षणाची सुविधा शालेय शिक्षण विभाग उपलब्ध करून देते. त्यामुळे प्रशिक्षित शिक्षक देशात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.

शालेय शिक्षणाला पूरक अशी आणखी एक बाब फिनलँडमध्ये पाहायला मिळते. ती म्हणजे ग्रंथालय चळवळ. शहरात एक मोठे ग्रंथालय असतेच. याखेरीज गावाच्या वेगवेगळ्या भागात लहान लहान ग्रंथालये उभारलेली आढळतात. या ग्रंथालयात लहान मुलांसाठी वेगळा विभाग असतो. या भागात लहान मुलांना आवडतील अशी पुस्तके ठेवलेली असतात. त्यांना तिथे बसून पुस्तक वाचता येईल अशा आकाराची टेबले आणि खुर्च्या ठेवलेल्या असतात. त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसतो.

(पृष्ठ क्र. २९ वर)



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

**वर्ष सव्वीसावे/अंक १२/डिसेंबर २०२५**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | अलौकिक शास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र राय | नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | मानसिक आरोग्य - मूलभूत अधिकाराचा भाग | प्रा. विनोद एच. वाघ | ११ |
| ४) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १४ |
| ५) | जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले प्रतापगड | दिलीप नारायण वंडलकर | २१ |
| ६) | मु. पो. १०; फुलराणी | चन्द्रशेखर टिळक | २५ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# अलौकिक शास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र राय

*अस्सल 'हिंदू' दृष्टीकोनातून आपल्या पुरातन विज्ञानसंशोधनांचा यथाशक्य इत्थंभूत अभ्यास करून, सारी तथ्ये जगासमोर मांडण्याचे तसेच, नवयुगातील रासायनिक उद्योगांची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य करणारे अलौकिक शास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्या कार्याचा आढावा या लेखात घेतला आहे. – संपादक*




(जन्म : २ ऑगस्ट १८६१, मृत्यू : १६ जून १९४४)

आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्या सन्मानार्थ, त्यांच्या जन्मशताब्दीला, पोस्टाचे तिकिट जारी करण्यात आले होते.

वर्तमान बांग्लादेशातील, जेस्सोर जिल्ह्यातील, रारुली काटीपारा गावी, २ ऑगस्ट १८६१ रोजी, आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांचा जन्म झाला. रारुलीत पहिली स्त्रियांची शाळा आणि माध्यमिक शाळाही त्यांच्या वडिलांनीच सुरू केली होती. प्रफुल्लचंद्र यांचे सुरूवातीचे शिक्षण याच शाळेत पार पडले. १८७० मध्ये त्यांचे कुटुंब कलकत्त्यास स्थलांतरित झाले. ते 'हेअर स्कूल' मध्ये भरती झाले. तिथे ते चौथ्या वर्गापर्यंत शिकले. मग काही वर्षे प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना शाळाच सोडावी लागली. १८७६ साली अल्बर्ट हायस्कूल, कलकत्ता येथे त्यांची शाळा पुन्हा सुरू झाली. ब्राम्हो समाजाचे संस्थापक केशवचंद्र सेन यांनी ती स्थापन केलेली होती. १८७९ साली प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांना 'मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूशन'मध्ये प्रवेश मिळाला. ही संस्था पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्थापन केलेली होती. कॉलेजात सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि प्रसन्नकुमार लाहिरी यांसारखे थोर शिक्षक, प्रफुल्लचंद्रांमधील राष्ट्रीय भावनेस प्रेरित करत असत. त्यांना समाजाच्या विकास आणि उन्नयनार्थ कार्य करण्यास प्रोत्साहित करत असत.

त्यांचे भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचे वर्ग प्रेसिडन्सी कॉलेज, कलकत्ता येथे होत असत. लवकरच रसायनशास्त्र हा त्यांचा आवडता विषय झाला. प्राध्यापक अलेक्झांडर पेडलर तो शिकवत असत. त्यांच्या शिकवण्यामुळे, रसायनशास्त्राचा अभ्यास करावा अशी प्रेरणा राय यांच्या मनात उद्‌भवली. बालपणापासून चौकस असल्याने केवळ वर्गखोलीतील प्रयोग पाहून त्यांचे समाधान होत नसे. प्रफुल्लचंद्र आणि त्यांचे जवळचे एक दोन मित्र यांनी मिळून घरीच एक छोटीशी प्रयोगशाळा स्थापन केलेली होती. कॉलेजात शिकवलेले प्रयोग तिथे ते पुन्हा करून पाहत असत. बी.ए.चा अभ्यासक्रम अर्धाच झालेला असताना, १८८२ साली त्यांनी एडिंबर्ग विद्यापीठाची गिलख्रिस्ट शिष्यवृत्ती प्राप्त केली. भारतातून केवळ दोनच विद्यार्थ्यांची निवड झालेली होती. प्रफुल्लचंद्र राय आणि एक पारशी विद्यार्थी बहादुरजी राय यांनी त्यांचा बी.एस.सी.चा अभ्यासक्रम १८८५ साली पूर्ण केला आणि वयाच्या २६ व्या वर्षी, १८८७ साली त्यांना निरिंद्रिय रसायनशास्त्रातील डी.एस.सी.पदवी प्रदान केली गेली. 'तांबे वा मग्न गटातील बहुसहबंध गंधक-प्राणिलेः समसंरचना मिश्रणे आणि रेण्वीय संयोगांचा एक अभ्यास (काँजुगेटेड सल्फेटस ऑफ कॉपर मॅगनेशियम ग्रुपः अ स्टडी ऑफ आयसोमॉर्फस मिक्स्चर्स अँड मॉलिक्युलर काँबिनेशन)' हा त्यांचा शोधनिबंध सर्वोत्तम ठरला. त्याला 'होप प्राईझ' मिळाले. ज्यामुळे त्यांना

संकटास हिरिरीने तोंड देणे याचेच नाव धैर्य !

आणखी एक वर्ष संशोधन सुरू ठेवणे शक्य झाले. १८८७ साली एडिंबर्ग विद्यापीठाच्या रासायनिक समाजाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यांचे सहकारी आणि शिक्षक यांना त्यांच्या शिस्तबद्ध आयुष्याचे, कामातील नीतिमत्तेचे आणि साधेपणाचे खूप कौतुक वाटे. देशात परतल्यावर, प्रफुल्लचंद्र राय यांना 'प्रादेशिक (प्रॉव्हिन्शिअल)' सेवांतर्गत रसायन-शास्त्रातील सहप्राध्यापकाची तात्पुरती नियुक्ती देण्यात आली. जुलै १८८९ मध्ये संशोधन आणि शिकवण्याच्या आवडीखातर त्यांनी ही नियुक्ती स्वीकारली.

आचार्य प्रफुल्लचंद्र राय हे पहिले भारतीय शास्त्रज्ञ होते, ज्यांनी भारतातील विज्ञानाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भवितव्याचा अभ्यास, विश्लेषण आणि पुनरीक्षण केले आहे. पौराणिक भारतात निर्मिलेल्या शास्त्रीय ज्ञानाचा खजिना त्यांनी वर आणला. ब्रिटिश लोक प्रशासनार्थ भारतातील संसाधने आणि संपदेची लूट करण्यासाठी आधुनिक विज्ञानाचा कसा उपयोग करून घेत होते हे त्यांच्या लक्षात आले. मग त्यांनी स्वतंत्र भारतातील वैज्ञानिक आणि औद्योगिक विकासावर आपले लक्ष केंद्रित केले. रसायनशास्त्रातील त्यांचे कार्यप्रवर्तक संशोधन, भारतीय शास्त्रज्ञांप्रतीच्या ब्रिटिशांच्या पक्षपाती प्रवृत्तीविरोधात त्यांनी केलेले बंड, भारतीय विद्यार्थ्यांना विज्ञानशिक्षण देण्याचे त्यांचे प्रयास आणि 'ब्रिटिश इंडियात'ही भारतीय उद्योग उभे करणे; हे सारेच कार्य पथदर्शी होते.

भारतीय शास्त्रज्ञ आणि त्यांचे आधुनिक जगातील विज्ञानविकासकार्य जगासच नव्हे तर भारतीयांनाही बहुशः अज्ञातच राहिले आहे. पुरातन काळापासून विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, जैवविज्ञाने आणि इतर निरनिराळ्या ज्ञानशाखांच्या विकासाचे कार्य विज्ञानमहर्षी करतच आहेत. आर्यभट, नागार्जुन, भास्कराचार्य यांसारख्या आपल्या शास्त्रज्ञांनी मानवतेकरता विज्ञानाचा पाया रचला. आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्या संशोधनांनी आणि प्रयोगांनी सर्व जगाचे लक्ष भारताकडे वेधून घेतले होते. भारतात आधीच अस्तित्वात असलेल्या शास्त्रीय ज्ञानाशी त्यास पूरक अशा आधुनिक विज्ञानाची सांगड आपण घातली पाहिजे हे त्यांनी जाणले होते. त्यांनी याचीही दखल घेतलेली होती की, अनेक हिंदू परंपरा शास्त्रीय प्रायोगिक ज्ञानावर आधारलेल्या होत्या. त्यांचे महत्त्व त्यांनी जगाला दाखवून दिले. ज्यांच्या प्रायोगिक शिक्षण पद्धतींचे अनुसरण वर्तमान पिढीतील शिक्षकांनी केले पाहिजे असे ते अत्युत्कृष्ट शिक्षक होते.

ते अलौकिक बुद्धिमत्तेचे रसायनशास्त्रज्ञ होते. रसायनशास्त्रातील दीपस्तंभ होते. ब्रिटिशांना त्यांच्या क्रांतिकारी विचारांची भीती वाटे. मात्र जगाने त्यांच्या शास्त्रीय संशोधनांचा सन्मानच केला. आधुनिक रसायनशास्त्रातील त्यांच्या संशोधनाने त्यांना मास्टर ऑफ नायट्राईटस ही उपाधी मिळवून दिली आणि त्यांच्या पथदर्शी 'द हिस्ट्री ऑफ हिंदू केमिस्ट्री' या पुस्तकाने, पुरातन भारतीय ऋषींकडे जगाचे लक्ष वेधले गेले. आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्याकडे दुर्दम्य साहस आणि देशभक्तीचा आदर्श म्हणून आदराने पाहिले जाते. भारतातील आधुनिक रसायनशास्त्राचे तर ते जनकच समजले जातात.

ते त्यांच्या काळातील पूर्णत्वास पोहोचलेले शास्त्रज्ञ होते. स्वदेशी उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम संसाधनांद्वारे शास्त्रीय संशोधन करण्याप्रतीची त्यांची कटिबद्धता सगळ्यात जास्त महत्त्वाची आहे. त्यांनी आधुनिक रसायनशास्त्रात भारताचे नेतृत्व केले. भारतीय रासायनिक समाजाची त्यांनी स्थापना केली. नव्या उद्यमाचीही उभारणी केली. आचार्य प्रफुल्लचंद्र राय राष्ट्रवादी कार्यकर्ते होते. भारतातील पुरातन ज्ञानाचे अर्जन करून ते अधिक समृद्ध करण्याचे काम त्यांनी केले. उगवत्या आधुनिक विज्ञानाशी त्यांनी त्याची सांगड घालून दिली. ते

लिहितात, एडिंबर्गमध्ये विद्यार्जन करत असताना असे आढळून आले की, जपानसहित प्रत्येक नागर देश जागतिक ज्ञानात भर घालत होता, त्यात भारतच मात्र मागे राहिलेला दिसला. त्याचे मला दुःख झाले. मी एक स्वप्न पाहिले होते की, ईश्वरी इच्छेने अशी वेळ येईल की, आपला देशही त्याची भूमिका भूषवेल. आचार्य प्रफुल्लचंद्र राय एक अद्वितीय कार्यशैलीचे शास्त्रज्ञ होते. एकाच वेळी ते तीन निरनिराळ्या क्षेत्रांत कार्यरत होते. शुद्ध रसायनशास्त्र संशोधन, उद्योग स्थापना आणि पुरातन शास्त्रीय संहितांचे समाकलन करणे.

१९१६ साली कलकत्ता विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू आशुतोष मुखर्जी यांनी प्रफुल्लचंद्र राय आणि चंद्रशेखर वेंकट रमण यांना अनुक्रमे पलित-प्रोफेसर ऑफ केमिस्ट्री आणि पलित-प्रोफेसर ऑफ फिजिक्स म्हणून; नव्यानेच उघडलेल्या युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्स, राजाबाजार कलकत्ता येथे रुजू होण्याकरता पाचारण केले. इथे त्यांना त्यांचे संशोधनाचे कामही त्यांच्या विद्यार्थ्यांसोबत चांगल्या प्रकारे करता आले. सायन्स कॉलेजला सर्वोत्कृष्टतेचे एक केंद्र म्हणून नावारूपास आणण्याचे श्रेय प्रफुल्लचंद्र राय यांना दिले जाते. याच काळात त्यांचे विद्यार्थी त्यांना 'आचार्य' संबोधू लागले होते.

प्रफुल्लचंद्र राय यांनी भारतात आपल्या संशोधनाची सुरूवात, खाद्यतेलांतील आणि इतर खाद्यपदार्थांतील भेसळी संवेदण्याच्या क्षेत्रात केली. बंगालमध्ये उपलब्ध असलेल्या खाद्यपदार्थांच्या नियमितपणे खालावणाऱ्या गुणवत्तेबाबत ते अत्यंत चिंतीत होते. १८९४ मध्ये, बाजारात उपलब्ध असलेली खाद्यतेले, तूप आणि चरबी यांच्या रासायनिक परीक्षणाची त्यांनी सुरूवात केली आणि त्याचे निष्कर्ष 'जर्नल ऑफ एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' मध्ये प्रकाशित केले. खाद्य पदार्थांकरता 'मानांकने' प्रस्थापित करण्याचे आणि बंगालमधील ओळखले गेलेले भेसळीचे पदार्थ सार्वजनिक मंचांवर उपलब्ध करून देण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते.

प्रफुल्लचंद्र राय यांनी, मेंडेलिव्ह यांच्या आवर्त-सारणीतील काही जागा भरू शकणाऱ्या नवीन मूलद्रव्यांचा शोध घेण्याच्या कुतूहलापोटी, काही भारतीय विरल खनिजांचे विश्लेषण सुरू केले. भारतात त्यांनी दूरवर आणि विस्तृत क्षेत्रात प्रवास केला. संयुगे आणि खनिजांचे नमुने गोळा केले. १८९४ पर्यंत त्यांनी, त्यांचे सर्व्हे ऑफ इंडियामधील मित्र थॉमस हॉलंड यांचे सहकार्याने, नमुन्यांचे एक विस्तृत वाचनालयच तयार केले होते. लवकरच त्यांनी पूर्वी अज्ञात असलेल्या 'मर्क्युरस नायट्राईट, Hg2(NO2)२' या संयुगाच्या कृत्रिम संश्लेषणाचा पहिला अहवाल सादर केला. प्रफुल्लचंद्र, संश्लेषक निरिंद्रिय रसायनशास्त्रज्ञ होते. सेंद्रिय रेणू आणि अभिक्रियांत त्यांना सक्रिय स्वारस्य होते. त्यांना ख्याती मिळवून देणारे त्यांचे सुरूवातीचे संशोधन हे निरिंद्रिय आणि सेंद्रिय नायट्राईटसच्या रसायनशास्त्रावरच आधारलेले होते. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्राईटस' मानले जाते.

शास्त्रीय तपासाची कला शिकलेल्या आणि त्यांचेपाशी संशोधन करत असलेल्या, देशभर विखुरलेल्या विद्यापीठांतील काही विख्यात लोकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. ज्ञानचंद्र घोष, संचालक आय. आय. एस. सी. बंगळुरू आणि संस्थापक संचालक, आय. आय. टी. खरगपूर, पंचन नियोगी, संस्थापक प्राचार्य राजा मोहिंद्रचंद्र कॉलेज, कलकत्ता. निलरतन राय, कलकत्ता विद्यापीठ. बिरेशचंद्र गुहा, भारतातील जैवरासायनिक संशोधनाचे संस्थापक, विख्यात शास्त्रज्ञ शांतीस्वरूप भटनागर हे प्राध्यापक अतुलचंद्र घोष यांचे विद्यार्थी होते, तर अतुलचंद्र घोष हे प्रफुल्लचंद्र राय यांचे विद्यार्थी होते.

१९२४ साली, प्रफुल्लचंद्र राय यांनी भारतीय रासायनिक समाजाच्या स्थापनेबाबत पुढाकार घेतला. ते स्वतः, शांतीस्वरूप भटनागर (विद्यार्थी), जे.एन.

मुखर्जी आणि जे.सी.घोष यांना नेहमीच असे वाटत असे की, भारतात रासायनिक समाज असावा. त्यानुसार भारतीय रासायनिक समाजाची स्थापना करण्यात आली आणि ९ मे १९२४ रोजी तशी विधिवत नोंदही करण्यात आलेली होती. प्रफुल्लचंद्र राय यांनी सलग दोन कार्यकाळांपर्यंत, या समाजाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. या नव्या समाजाची स्थापना आणि त्याच्या नियतकालिकाचे शैक्षणिक जगात स्वागतच झाले.

या समाजाने त्यांच्या नेतृत्वाखाली, नोव्हेंबर १९२४ मध्ये, भारतातील पहिले संशोधनाखातरचे नियतकालिक प्रकाशित केले. 'द जर्नल ऑफ इंडियन केमिकल सोसायटी' हे त्याचे नाव. राय यांचा असा विश्वास होता की, एका सामान्य भारतीयासमोर येणाऱ्या समस्या, एखादा भारतीयच नीट समजून घेऊ शकेल. शिवाय विज्ञानाचा उपयोग करून घेऊन राष्ट्रीय पुनरुज्जीवन करण्याचीही आपल्याला गरज आहे. याकरता त्यांनी मेघनाथ साहा यांच्या सहकार्याने 'भारतीय विज्ञानवार्ता संघटनेची (इंडियन सायन्स न्यूज असोसिएशन-आय.एस.एन.ए.-इन्सा)' स्थापना केली. याचे उद्दिष्ट, वैज्ञानिक क्षेत्रातील साध्य झालेल्या सिद्धींची माहिती प्रसृत करून युवा वैज्ञानिकांना वर्तमान समाजातील समस्यांच्या निराकरणास उद्युक्त करण्याचेच होते. प्रफुल्लचंद्र राय हे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते आणि १९३५ साली 'सायन्स अँड कल्चर' हे नियतकालिक सुरू करण्यातही त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रफुल्लचंद्र राय हे एक राष्ट्रवादी शास्त्रज्ञ होते. बालपणापासूनच त्यांच्या मनात भारतास पुन्हा पूर्ववैभवाप्रत पोहोचवण्याचा ध्यास होता. वर्तमानातील भारतीयांनी बदलत्या काळाशी स्पर्धा करून भारतास पूर्ववैभवाप्रत नेण्याची गरज असल्याचेही ते सांगत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, इतर देश संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या विकासाकरता वैज्ञानिक संस्था स्थापन करण्याकडे लक्ष देत होते. भारतीय राष्ट्रवादाचे जनक, देशभक्त सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ज्यांनी राय यांना महाविद्यालयात इंग्रजी शिकवले होते, त्यांनीच त्यांच्यात राष्ट्रवादाची ज्योतही चेतवलेली होती. भारतात भारतीयांनी चालवलेली आणि त्यांनीच व्यवस्थापिलेली, वैज्ञानिक स्वावलंबन प्रणाली निर्माण करण्याची गरज भारतीय शास्त्रज्ञांना सततच जाणवत होती. प्रफुल्लचंद्रांनी पहिली संशोधन प्रयोगशाळा प्रेसिडेन्सी कॉलेजात सुरू केली, जी संपूर्ण भारतात रासायनिक संशोधनाचा पाळणा ठरली. प्रफुल्लचंद्रांना असे आढळून आले की, आपल्या देशास विज्ञानसेवेकरता समर्पित अशा उच्चशिक्षित आणि समर्थ संशोधकांची आवश्यकता आहे. प्रफुल्लचंद्रांना कलकत्ता विद्यापीठातील शिक्षण तज्ज्ञांमध्ये संशोधक अभ्यासांची उणीव सलत असे. त्यामुळे त्या काळात बंगालात शैक्षणिक प्रणाली मूळ धरताना दिसल्यास ते तिचे पूर्ण समर्थन करत. राष्ट्रीय शिक्षण परिषदेशी त्यांनी स्वतःला दृढतेने जोडून घेतलेले होते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरणाच्या आधारासह स्वदेशी आत्मा असलेली ही अध्यापनशास्त्रीय संस्था होती.

सतीशचंद्र मुखर्जी यांनी सर अरबिंदो यांचे सहकार्याने राष्ट्रीय शिक्षण परिषद उभी केलेली होती. परिषदेने १९२१ साली अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा विस्तार करण्याचे योजिले. नवे अभ्यासक्रम सुरू करण्याचे दृष्टीने, प्रफुल्लचंद्रांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासक्रम पुनरीक्षण समिती स्थापन करण्यात आली. नव्या अभ्यासक्रमांत यांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी व्यतिरिक्त रासायनिक अभियांत्रिकी शाखेचीही भर करण्यात आली. पुढे जाऊन, प्रफुल्लचंद्रांना बंगालच्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे अध्यक्षच करण्यात आले. ते अशा मताचे होते की, भारतीय विद्यार्थ्यांनी नवी कौशल्ये आणि तंत्रे शिकून घ्यावीत. केवळ पदव्या संपादन करणे, जगात नव्याने उदयमान होत असलेल्या आधुनिक युगाकरता पुरेसे नव्हते. त्यांनी

विद्यार्थ्यांना, पदव्यांमागे वा आरामदायक सरकारी नोकऱ्यांमागे पळण्याऐवजी, स्वावलंबी उद्योजक होण्यास प्रवृत्त केले.

१९२० नंतरच्या दशकात राय यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. राजकीय आघाड्यांशी संलग्न राहिले. १९२० मध्ये असहकारिता चळवळीच्या कळसास पोहोचण्याच्या काळात, त्यांनी ते विख्यात प्रेरक वाक्य म्हटले होते, विज्ञान थांबू शकते, मात्र स्वराज्य नाही.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदू आणि मुसलमानांनी निराळ्या निवडणुका लढवण्याबाबतचा नियम विधान-सभांना लागू केला. यावर काँग्रेस तटस्थ राहिली. प्रफुल्लचंद्रांनी मात्र धर्माधिष्ठित राष्ट्रवादास विरोध केला. त्यांनी तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाच्या संधीसाधू धोरणांवर टीका केली. १९३८ मध्ये जेव्हा दुसऱ्यांदा नेताजींची अध्यक्ष म्हणून निवड करण्यावरून काँग्रेस दुभंगलेली होती, तेव्हा सुभाषचंद्र बोसांना समर्थन देण्याकरता राय हे प्रखरतेने बोलत असत. क्रांतिकारकांप्रती त्यांना सहानुभूती होती. त्यांना ते आपल्या कारखान्यांत आश्रय देत असत. अन्नही पुरवत असत. राय यांच्या मृत्यूनंतर अनेक क्रांतिकारक आणि त्यांच्या सहकार्यांना, स्फोटके तयार करण्यासाठी त्यांनी अप्रत्यक्षपणे मदत केली होती. तत्कालीन सरकारी नोंदींत त्यांचा उल्लेख, शास्त्रज्ञाच्या मुखवट्याखालील क्रांतिकारक असाच होता.

प्रेसिडेन्सी कॉलेजमधील कर्तृत्वाच्या दिवसांत, निसर्गाने आपल्या वरदहस्ताने, हजारोंच्या संख्येत बंगालात विखुरलेल्या कच्च्या मालांचा वापर कसा करता येईल? कुपोषितांच्या मुखी घास कसा पोहोचवता येईल? हे विचार आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्या मनात सतत सुरू होते. बालपणापासूनच प्रफुल्लचंद्र राय यांनी देशात वारंवार पडणारे दुष्काळ आणि गरीबी अनुभवलेली होती. त्यांच्या पुरातन भारताच्या इतिहासाबाबतच्या ज्ञानामुळे, ते ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीच्या अत्यंत विकसित भारतीय उद्योगांशी परिचित होते. ब्रिटिशांनी त्यांची स्वारस्ये जपण्याकरता एतद्देशीय उत्पादकांना चिरडून टाकले. बाहेरील आक्रमक सत्ताधाऱ्यांखाली, सावकाशपणे भारतीयांची प्रेरणा आणि नव-उद्योग स्थापनेबाबतची उमेद नाहीशी झाली.

प्रफुल्लचंद्रांच्या इंग्लंडमधील वास्तव्यादरम्यान त्यांनी इंग्लिश समाजातील सामाजिक आणि शास्त्रीय बदल अनुभवले होते. इंग्लंडहून परतल्यावर त्यांनी, इंग्लंडहून वा युरोपातून त्या काळी मोठ्या प्रमाणात इथे मागवली जात असलेली काही रसायने इथेच उत्पन्न करण्याची आपली योजना तयार केली. आयातीवर अवलंबून असल्यामुळे विद्यमान स्थानिक उद्योग वाढ वा नवनिर्मितीबाबत अनुत्सुक होते. बंगालात बेरोजगारी वाढत होती. त्यांनी अद्ययावत वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग करून आणि उद्योगात त्याचा वापर करून औद्योगिक अर्थव्यवस्था पुनरुज्जीवित करण्याचे मनावर घेतले. सुरूवातीच्या रु. ७००/- च्या गुंतवणुकीने, १८९३ मध्ये, त्यांनी भारतातील पहिली औषधनिर्माण पेढी स्थापन केली. तिचे नाव 'बेंगाल केमिकल्स'. हल्ली तिला 'बेंगाल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड' (बी.सी.पी.डब्ल्यू.एल.) म्हणून ओळखले जाते. कोविड काळात या पेढीला खूपच महत्त्व प्राप्त झालेले होते. भारत सरकारने तिला खूप आवश्यक असलेले हायड्रोक्सिक्लोरोक्विन (एच.सी.क्यू.) हे औषध निर्माण करण्याचा परवाना दिलेला होता. या उद्योगाच्या स्थापनेमुळे त्यांना स्वप्नातील संशोधनाच्या स्वदेशीचे, स्वावलंबनाचे उद्दिष्ट साध्य करता आले. स्वदेशी उद्योगाचा विकास झाला.

बी.सी.पी.डब्ल्यू.एल. हा अंतर्गत संशोधन सुविधांसह स्थापन करण्यात आलेला उद्योग होता. त्यामुळे 'टिंचर ऑफ नक्स व्होमिका', 'स्पिरिट ऑफ

नायट्रिक इथर', 'सिरप फेर्री लोदिदी' यांसारख्या आयातीत रसायनांकरताच्या पर्यायी आणि सक्षमखर्ची उत्पादनप्रक्रिया विकसित होऊ शकल्या. बेंगाल केमिकल्समध्ये निर्मित उत्पादने १८९८ मध्ये कलकत्त्यात भरलेल्या इंडियन मेडिकल काँग्रेसमध्ये प्रदर्शित करण्यात आली. उपस्थित डॉक्टरांना त्यांनी खूप प्रभावित केले. त्यांपैकी अनेकांनी नंतर याच औषधांची शिफारस लिहून देण्यास सुरूवात केली. निरिंद्रिय आणि विश्लेषक पार्श्वभूमी असल्याने प्रफुल्लचंद्र राय यांच्याकरता, औद्योगिक कामगारांना या कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हे काहीसे सोपे होते. त्यांनी ते लक्ष्य लवकरच साधलेही. त्यांचे शैक्षणिक काम पूर्ण झाल्यानंतर संध्याकाळी ७ ते ८ दरम्यान दररोज ते बेंगाल केमिकल्समध्ये काम करत असत. ते लिहितात, ''आजवर आयात केल्या जात असलेल्या औषधी द्रव्यांची स्थानिकरीत्या निर्मिती करण्याची संकल्पनाच अमृतासारखे कार्य करत होती. १९०३ साली सर जॉन कमिंग यांनी असे नोंदवले की, बी.सी.पी.डब्ल्यू.एल. इज वन ऑफ द मोस्ट गो-अहेड यंग एंटरप्राईझेस इन बेंगाल.''

त्यांच्या उद्योगाने रासायनिक प्रक्रिया उद्योगाचा आवश्यक भाग असलेल्या गंधकाम्लासारख्या मूलभूत आवश्यक प्रक्रियकांची निर्मितीही सुरू केली. यथावकाश तो, साबण, कागद, खते आणि तेले यांसारख्या इतर निरनिराळ्या उत्पादनांकडेही वळला. प्रफुल्लचंद्र राय यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने, 'कॉटन मिल्स', 'बेंगाल साल्ट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी', 'बेंगाल पॉटरीज', 'बेंगाल इनॅमल वर्क्स', 'बेंगाल स्टीम नेव्हिगेशन', 'बेंगाल पेपर', 'बेंगाल कॅनिंग अँड कोंडिमेंटस', 'नॅशनल टॅनरीज', 'चक्रवर्ती, चटर्जी अँड कंपनी लिमिटेड (प्रकाशन गृह)' आणि 'भारती स्केल्स अँड इंजिनिअरिंग कंपनी' इत्यादी इतर उद्योग उभे केले. 'नॅफ्थॅलिन' आणि 'फेनिल बॉटल्स' सारखी सर्वसामान्य निर्जंतुकीकारके आजही आपल्यापैकी अनेक जण वापरत आहेत. नेते, शास्त्रज्ञ आणि डॉक्टर्स यांसारख्या अनेक क्षेत्रांतील अनेक भारतीय यथावकाश प्रफुल्लचंद्र राय यांच्या उद्यमांचे समर्थन करू लागले. सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास, डॉ. अमूल्यचरण बसू, राधागोबिंद कार, कुलभूषण भादुरी, चंद्रभूषण भादुरी, सुरेशप्रसाद सर्वाधिकारी यांसारखे लोक त्यांच्या उद्यमांच्या यशाकरता पुढे आले.

तत्कालीन विख्यात ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ सर थॉमस थॉर्पे यांनी 'नेचर'मध्ये एक, दोन पानी मुखपृष्ठलेख लिहिला ज्याचे शीर्षक होते, 'द लाईफ वर्क ऑफ अ हिंदू केमिस्ट'. ते म्हणतात, ''सर प्रफुल्लचंद्र राय, प्राध्यापक रसायनशास्त्र, प्रेसिडेन्सी कॉलेज हे या देशातील रसायनशास्त्रज्ञांना; त्यांच्या एकट्याच्या किंवा विद्यार्थ्यांसहित, 'ट्रॅन्झॅक्शन्स ऑफ द केमिकल सोसायटी', 'काँटिनेंटल जर्नल्स' किंवा 'जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' या नियत-कालिकांतून; प्रामुख्याने निरिंद्रिय वा सेंद्रिय नायट्राईट्स-बाबत प्रकाशित केलेल्या शंभरांहून अधिक शोधनिबंधांमुळे चांगल्या प्रकारे ज्ञात आहेत.''

१९१६ मध्ये ते 'पलित प्राध्यापक' म्हणून कलकत्ता विद्यापीठात रुजू झाले आणि मग १९२१ नंतर त्यांनी वेतन घेणे थांबवले आणि विद्यापीठास तो पैसा रसायनशास्त्र विभागाच्या विकासाकरता खर्च करण्यास सांगितले. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या २० वर्षांत ते विद्यापीठाच्या इमारतीतील एका खोलीत राहिले. ते सिलिंग फॅनलासुद्धा चैनीची वस्तू मानत असत. याच खोलीत आता प्रफुल्लचंद्र राय संग्रहालय आहे. अनेक विद्यार्थी, मुख्यतः गरीब विद्यार्थी त्यांचेसोबत राहत असत. १९२२ मध्ये त्यांनी रु. १०,०००/- ची देणगी देऊन थोर भारतीय रसायनशास्त्रज्ञ नागार्जुन यांच्या नावाने दरसाल एक पारितोषिक देण्याची व्यवस्था केली. १९३६ मध्ये

आणखी एक देणगी देऊन प्राध्यापक आशुतोष मुखर्जी यांचे नावे तशीच व्यवस्था केली. कलकत्ता विद्यापीठास त्यांनी, त्यांच्या निवृत्तीचे समयी, रसायनशास्त्राच्या विस्तार आणि विकासाकरता, र.१,८०,०००/- देणगी दिली.

१९२१ मध्ये खुल्ना येथील दुष्काळात, दुष्काळाने प्रभावित जिल्ह्यांतील गरीबांच्या पोषणार्थ त्यांनी खुल्ना दुष्काळनिवारण समिती स्थापन केली. १९२२ मध्ये प्रफुल्लचंद्रांनी शास्त्रज्ञ आणि विद्यार्थ्यांना पूरप्रभावित उत्तर बंगालच्या मदतीकरता प्रेरित केले. एका महिन्यात रु.३ लाख गोळा झाले. सुभाषचंद्र बोस यांच्या सोबतीने ते प्रभावित भागात गेले आणि बेंगाल दुष्काळ निवारण समिती स्थापन केली. ते स्वतःच समितीचे अध्यक्ष झाले. त्यांच्या आवाहनास मान देऊन त्यांचे अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक पी.सी.मित्र, मेघनाद साहा, प्राध्यापक निरेन चौधरी यांसारख्या कॉलेजातील सहकाऱ्यांनीही नागरिकांच्या मदतीकरता चोवीस तास काम केले. १९२३ मध्ये पुन्हा बंगाल निवारण समितीने लाखो पूरग्रस्तांकरता, रु.२५ लाखाची रोकड गोळा केली. १९३१ मध्ये उत्तर बंगालमध्ये पुन्हा पूर आला. ७० वर्षे वय असूनही प्रफुल्लचंद्रांनी संकट तारण समिती स्थापून प्रभावित लोकांना मदत पोहोचवली. यावेळी त्यांनी एक नवीन साधन निर्माण केले. सहकारी समित्या स्थापन केल्या, ज्यात त्यांच्या विद्यार्थ्यांचा आणि सर्वसामान्य नागरिकांचाही थेट सहभाग होता.

आचार्य राय लिहितात की, ''हिंदू राष्ट्रास वैभवशाली इतिहास आहे. राष्ट्रातील विस्तृत आणि सुप्त सामर्थ्ये भवितव्यातील आणखीही वैभवशाली काळाची अपेक्षा करतात. जर या इतिहासातून माझ्या देशबांधवांना बुद्धिमान राष्ट्रांच्या उतरंडीत आपले गतवैभवी स्थान पुनर्प्राप्त करण्याची प्रेरणा लाभली तर, हा इतिहास उजागर करण्यात माझे कष्ट वाया गेले असे ठरणार नाही. त्याकरता त्यांनी पौराणिक भारतीय रसायनशास्त्राचा जगास परिचय करून देणारे पुस्तक लिहिले. द हिस्ट्री ऑफ हिंदू केमिस्ट्री.''

प्रफुल्लचंद्र राय हे काळाच्या पुढेच चालणारे द्रष्टे होते. पुरातन शास्त्रीय प्रयोगांची सांगड आधुनिक उदयमान विज्ञानांशी घालण्याचे महत्त्व त्यांनी जाणले होते. त्यांचे असे निरीक्षण होते की, भारतात शास्त्रीय ज्ञान अपार आहे आणि त्यांच्या काळातील ज्ञानाहून अतिप्रगतही आहे. मात्र ते विखुरलेले आहे. आंशिकरीत्या ते राजेमहाराजांच्या वाचनालयांतून, मंदिरांच्या वाचनालयांतून, युरोपीय संग्रहालयांतून, काही व्यक्तींच्या संग्रहांतून, प्रादेशिक भाषांतून, संस्कृतातून आणि पालीतूनही विखुरलेले आहे. कालौघात मुस्लिम व ब्रिटिश प्रणालींच्या आघातामुळे, लोक ते वाचत नाहीसे झालेले आहेत. त्यामुळेच ते ज्ञान पुढील पिढ्यांकडे सुपूर्तही केले गेलेले नाही. मग शास्त्रीय ज्ञानाचे एकमुस्त संकलन करण्याचे हे प्रचंड काम हाती घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

अनेक वर्षे ते भारतीय शास्त्रीय साहित्यातील सुश्रुत, चरक इत्यादी संहितांचा अभ्यास करत होते. शेकडो वर्षांपूर्वीच्या भारतीय शास्त्रीय विकासाचा शोध घेत होते. त्यांनी त्याकरता संस्कृत आणि पाली या भाषा, पंडित नबकांत कविभूषण आणि आचार्य ब्रजेंद्रनाथ सिल या प्रथितयश विद्वानांकडून शिकून घेतल्या. बनारसमधील (हल्लीचे वाराणसी) निरनिराळ्या मंदिरांच्या वाचनालयांतील पुरातन हस्तलिखितांचा शोध घेण्यात पंडित नबकांत कविभूषण यांनी त्यांचेसोबत कामही केले होते. त्यांनी संस्कृत भाषेतले अनेक खंड आणि पुस्तकांच्या संहितांचे संकलन केले. त्यात प्रक्रिया, तंत्रे, कार्यप्रणाली, गुणधर्म आणि इतर तपशील, रासायनिक ज्ञानाचा वापर आणि पुरातन भारतातील रासायनिक संकल्पना हे सर्व दिलेले होते. प्रफुल्लचंद्रांनी पुरातन भारतीय वैद्यक आणि रासायनिक शब्दकोशांचा

अभ्यास केला. त्यात उदोयचंद दत्त यांचा 'मटेरिआ मेडिका ऑफ हिंदूज', कन्हैयालाल डे यांचा 'इंडियन मटेरिआ मेडिका अँड इंडिजिनस ड्रग्ज ऑफ इंडिया' या शब्दकोशांचा समावेश होता. त्यांनी कविराजांकडून मार्गदर्शन आणि मदत घेतली. ते भारतीय प्रणालीचे पारंपरिक विद्वान होते. कुर्ची (होलार्रेना अँटिडायसेंट्रिका), कालमेघ (अँड्रोग्राफिस पनिकुलाटा), वसाका सिरप (अधातोडा वसिका) इत्यादी द्रव्यांचा नेमकेपणा निश्चित करण्यासाठी प्रफुल्लचंद्रांनी अनेक प्रयोग केले.

आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्या 'द हिस्ट्री ऑफ हिंदू केमिस्ट्री' या रसशास्त्र आणि आयुर्वेदावरील पुस्तकाने भारतीय परिसशोधाकडे (अल्केमी) साऱ्या जगाचे लक्ष वेधले. परिसशोध आणि धात्विक पाऱ्यावर आधारित शास्त्रीय वैद्यक यांचा उगम भारतातच झाला, हे सांगितले. त्यांना असे आढळून आले की खलिफा हरून आणि खलिफा मन्सूर यांच्या शासन काळात (इसवीसन ७००) चरक आणि सुश्रुत यांच्या कामांचा अनुवाद अरबी भाषेत करण्यात आला. 'द हिस्ट्री ऑफ हिंदू केमिस्ट्री' हे पुस्तक, नागार्जुन आणि चरक यांसारख्या भारतीय ऋषींचे महान कार्य जगासमोर सादर करते. सुश्रुतांच्या पुस्तकात उल्लेखित निरनिराळ्या सौम्य अल्के आणि दाहके (अल्कलीज अँड कॉस्टिक्स) यांचे तपशील देते. 'रसार्णव' या पुरातन पुस्तकात जस्त निष्कर्षण प्रक्रिया दिलेली आहे. आधुनिक रसायनशास्त्रज्ञ आजही हीच प्रक्रिया अवलंबत असतात. भारतीय ज्ञान युरोपीय ज्ञानाहून खूपच उच्च दर्जाचे होते. भारतीयांनी युरोपीय लोकांहूनही खूप पूर्वी रसायनशास्त्रातल्या संकल्पना आणि प्रायोगिक ज्ञान विकसित केले. रसायनशास्त्राच्या युरोपीय इतिहासात, वैद्यकीय सेवांकरता रासायनिक ज्ञानाचा उपयोग आणि पाऱ्याच्या द्रव्यांचा शरीरांतर्गत उपयोग प्रथम केल्याचे श्रेय पॅरासेल्सस यांना दिले जाते. त्यांच्यापूर्वी अनेक शतके आधीच भारतातील नागार्जून आणि पतंजली यांनी पाऱ्याच्या द्रव्यांचा शरीरांतर्गत प्रथम उपयोग केलेला होता. 'अरबांचे भारतीयांच्या ऋणात असणे' या प्रकरणात हेही नमूद केलेले आहे की, कोणत्या माध्यमातून हे भारतीय ज्ञान युरोपापर्यंत पोहोचले.

प्रफुल्लचंद्रांची इतर महत्त्वाची पुस्तके, 'रासायनिक परिभाषा'-१९१९, 'खाद्यविज्ञान'-१९३६, 'सरल विज्ञान'- १९०२, 'देसी रंग'- १९२२ ही आहेत. 'प्रवासी', 'प्रकृती', 'बंगवाणी' यांसारख्या आघाडीच्या नियतकालिकांतही त्यांनी अनेक लेख लिहिलेले आहेत. १९१२ मध्ये डर्हाम विद्यापीठाने त्यांचा, सन्माननीय डी.एस.सी. पदवी देऊन सत्कार केला. १९१२ मध्येच त्यांना 'चॅम्पिअन ऑफ द ऑर्डर ऑफ इंडियन एम्पायर (सी.आय.ई.)' या उपाधीने गौरव करण्यात आला आणि १९१९ मध्ये 'नाईट बॅचलर' हा खिताबही देण्यात आला.

अस्सल 'हिंदू' दृष्टीकोनातून आपल्या पुरातन विज्ञानसंशोधनांचा यथाशक्य इत्थंभूत अभ्यास करून, सारी तथ्ये जगासमोर मांडण्याचे तसेच, नवयुगातील रासायनिक उद्योगांची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य करणाऱ्या या अलौकिक शास्त्रज्ञास विनम्र प्रणाम!

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# मानसिक आरोग्य - मूलभूत अधिकाराचा भाग

*मानसिक आरोग्य - मूलभूत अधिकार या विषयाची अभ्यासपूर्ण माहिती या लेखात दिली गेली आहे.*
*- संपादक*

नुकतेच मा. सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्य हा संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचा निर्णय दिला. सुकदेब सहा विरुद्ध आंध्रप्रदेश राज्य या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या आत्महत्येच्या मानसिकतेवर चिंता व्यक्त करून त्यावर मात करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करून दिली. एका खाजगी कोचिंग क्लासमध्ये वैद्यकीय पूर्व-परीक्षेची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीने आत्महत्या केली. झालेल्या पोलीस तपासाबद्दल पालक समाधानी नसल्यामुळे त्यांनी आंध्रप्रदेशच्या उच्च न्यायालयात धाव घेतली व सीबीआयने तपास करावा म्हणून विनंती केली. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केली. सर्वोच्च न्यायालयांनी तपास सीबीआयला सुपूर्द करून, संपूर्ण भारतातील शाळा-महाविद्यालयानी विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य स्वस्थ व उत्तम असण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करून दिली.

मागील काही वर्षात विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येची प्रवृत्ती वाढत चालली आहे. २००१ मध्ये ५४२५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती, जी संख्या २०२२ मध्ये १३,०४४ एवढी झाली. ही आकडेवारी पोलिसांच्या अहवालात नमूद आहे. या आत्महत्या शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे व खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये झाल्या आहेत. वैद्यकीय, आयआयटी, एनआयटी अशा शैक्षणिक संस्थांमधील अनेक विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या या आकड्यामध्ये समावेश आहे. अशा आत्महत्याच्या कारणांमध्ये रॅगिंग, तीव्र शैक्षणिक स्पर्धा, भावनिक त्राण, एकटेपणा, जाती-आधारित भेदभाव, आर्थिक ताण, लैंगिक छळ, पालकांची अवास्तव अपेक्षा आणि करत असलेल्या शिक्षणाबद्दलची उदासीनता यांचा समावेश होतो. रोहीत वेमुला आत्महत्या प्रकरण आपणा सर्वांना माहीत असेलच. ऑस्ट्रिया, न्यू-झीलंड, कॅनडा, साऊथ कोरिया आणि युएस या देशामध्ये देखील तरुण/विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्याचे प्रमाण मोठे आहे. पण त्यांची कारणे वेगळी आहेत. एनसीआरबीच्या म्हणण्याप्रमाणे २०११ ते २०२१ या दहा वर्षात विद्यार्थ्यांमधील आत्महत्येचे प्रमाण ७० टक्क्यांनी वाढले आहे. राजस्थानमधील कोटा या ठिकाणी असलेल्या कोचिंग क्लासेस मध्ये २०२३ मध्ये २६ तर २०२४ मध्ये २१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. १७-१८ ते २४-२५ वयाच्या या मुलांना अशी कोणती समस्या असते की त्यामुळे त्यांना आत्महत्या करून जीव संपवावासा वाटतो. वर उल्लेख केलेल्या अनेक कारणांचा यात समावेश आहे. मानसिक आरोग्य कुमकुवत झाल्याशिवाय असे पाऊल कुणीही उचलत नाही. म्हणूनच शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, प्रशिक्षण कोचिंग, कोचिंग क्लासेस आणि विशेष म्हणजे घर या ठिकाणच्या जबाबदार व्यक्तीला अशा विद्यार्थ्यांच्या मनात चाललेली चल-बिचल ओळखता आली पाहिजे व त्याचा वेळीच उपचार केला पाहिजे. आज सगळ्याच वयाच्या वर्गाचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थीही यास अपवाद नाही. स्पर्धा जीवघेणी झाली आहे आणि लहान वयात काहीतरी मोठे करून

दाखवण्याची सक्ती किंवा इच्छा यास कारणीभूत आहे. सामाजिक माध्यमे, सायबर जाळे, प्रेमभंग अशी शिक्षणाव्यतिरिक्त असलेली कारणे ही तरुणांच्या आत्महत्येमागे आहेत. या सर्वांचा विचार करूनच सर्वोच्च न्यायालयाने अनेक मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करून ते तत्त्वे सर्व शाळा, महाविद्यालयांनी सक्तीने लागू करावी असा आदेश दिला.

अमित कुमार विरुद्ध भारत सरकार (२०२५) या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायमूर्ती रवींद्र भट यांच्या अध्यक्षतेखाली एका राष्ट्रीय टास्क फोर्सची स्थापना केली आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांमधील वाढत चाललेल्या आत्महत्येच्या मानसिकतेवर मात करण्यासाठी काही उपाययोजना करण्याचा आदेश दिला. या फोर्सने ८ ऑगस्ट २०२५ रोजी एका वेबसाइटचे अनावरण केले. ही टास्क फोर्स देशभरातील केंद्रीय आणि राज्य विद्यापीठांपासून खाजगी महाविद्यालये, तांत्रिक संस्था आणि इतर उच्च शिक्षण संस्था (HEIs) पर्यंत विविध संस्थांशी संवाद साधत आहे. या माध्यमातून सर्वसमावेशक दृष्टिकोन समोर ठेवून शिफारसी तयार केल्या जाणार आहे.

केंद्र शासनाने देखील २०२३ मध्ये उम्मीद (Understand, Motivate, Manage, Empathise, Empower, and Develop) नावाची संस्था काढून विद्यार्थ्यांच्या आत्महत्येयविषयी काही उपाययोजना आखल्या आहेत. तसेच, मनोदर्पण नावाची संस्था ही या कार्य क्षेत्रात कार्यरत आहे. DMHP (जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम) या कार्यक्रमांतर्गत अनेकांना याविषयी प्रशिक्षित केले जात आहे. महाराष्ट्र शासनाने देखील काही उपाययोजना आखल्या आहेत, ज्यामध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा मानसिक आरोग्यासाठी 'संवाद' आणि छात्रमानस योजना आहेत. शाळेत विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शनिवार यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य टिकवणे, ताणतणाव व्यवस्थापनासाठीची क्षमता वाढविणे, आत्मविश्वास निर्माण करून नैराश्यावर मात करण्यास सक्षम बनविणे अशा प्रकारचा आहे.

सुकदेब साहू या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने खालील मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहे जिची अंमलबजावणी करणे सर्व शाळा, महाविद्यालय याना बंधनकारक आहे.

१. सर्व शैक्षणिक संस्थांनी UMMEED, MANO-DARPAN आणि राष्ट्रीय आत्महत्यापासून प्रतिबंध धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित एकसारखी मानसिक आरोग्य धोरण तयार करावी, वार्षिक पुनरावलोकन करुन ते आपापल्या वेबसाईट आणि नोटीसबोर्डवर प्रकाशित करावी.

२. १०० पेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या संस्थांनी किमान एक पात्र समुपदेशक/ मानसोपचारतज्ज्ञ नियुक्त करावा; कमी विद्यार्थी असल्यास बाह्य व्यावसायिकांची मदत घ्यावी..

३. विद्यार्थी–समुपदेशक प्रमाण संतुलित असावे. विशेषतः परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन व संवेदनशील मदत करणारे समुपदेशक नेमावे.

४. खाजगी कोचिंग संस्था आणि इतर शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांचे वर्गीकरण त्यांच्या क्षमता/अक्षमतांनुसार करू नये. तसेच सर्वासमोर अपमान वाटेल असे बोलणे टाळावे किंवा अनावश्यक शैक्षणिक लक्ष्ये देऊ नयेत.

४. मानसोपचार सेवा, स्थानिक रुग्णालये, आत्महत्या–पासून प्रतिबंध करणाऱ्या संस्थेचे हेल्पलाइन क्रमांक स्पष्ट दिसणाऱ्या ठिकाणी जसे वसतिगृह, वर्गखोली, वेबसाईट इथे मोठ्या अक्षरांत लिहावे.

५. शिक्षक आणि शिक्षेत्तर कर्मचारी यांनी किमान

वर्षाला दोनदा या विषयांवर अनिवार्य प्रशिक्षण घ्यावे. या माध्यमातून शिक्षण व प्रशासनामध्ये सर्वच विद्यार्थ्यांना भेदभावरहित, संवेदनशील पद्धतीने वागणूक द्यावी.

६. शाळांमध्ये लैंगिक अत्याचार, छळ, जातिभेद, धर्मभेद, लैंगिकता, अपंगत्वावर आधारित छळ यांच्याविरुद्ध गुप्त तक्रार, तपास व समर्थन यासाठी कठोर, गोपनीय यंत्रणा तयार करावी, विद्यार्थ्यांची सुरक्षितता निश्चित करावी. अशा घटनास समयोचित उत्तर न दिल्यास प्रशासनाला जबाबदार धरून दंडनीय कारवाई करावी.

७. शाळा, महाविद्यालयांनी पालकांसाठी नियमितपणे (प्रत्यक्ष/आभासी) पद्धतीने मानसिक आरोग्य-विषयक आणि संवेदनशीलता वाढवणारे कार्यक्रम आयोजित करावेत.

८. शिक्षणसंस्थांनी या संबंधीचा वार्षिक अहवाल तयार करावा, ज्यात विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य याविषयीचे कार्यक्रम, प्रशिक्षण सत्र यांच्याविषयी माहिती असावी. सदर अहवाल राज्य शिक्षण विभाग, UGC, AICTE, CBSE इ. यांनाही सादर करावा.

९. शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडा, कला, व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे, तसेच परीक्षांचे स्वरूप वेळोवेळी सुधारून परीक्षेचा अनावश्यक त्रास कमी करावा.

१०. खाजगी कोचिंग क्लासेस व प्रशिक्षण केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी समुपदेशक, करिअर सल्लागार उपलब्ध करून द्यावे. विविध करियर मार्गाविषयी माहिती देणे, निर्णय घेण्यास आधार व मार्गदर्शक नेमावे.

११. आवासीय संस्था, वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व शिक्षणाला अनुकूल वातावरण तयार करावे. विद्यार्थ्यांना मादक व अंमली पदार्थापासून व इतर हानिकारक घटकांपासून दूर ठेवावे.

१२. वसतिगृहामध्ये छतावरील पंख्यास सुरक्षित करावे जेणेकरुण कुणाच्या आत्महत्येमध्ये या पंख्याचा वापर होऊ नये, तसेच छत, बाल्कनीसारख्या ठिकाणी प्रवेश मर्यादित करावा जेणेकरुण अचानक होणाऱ्या आत्महत्येच्या प्रयत्नांना प्रतिबंध करता येईल.

१३. सर्वोच्च न्यायालयाने यावेळी मोठ्या शहरातील (मुंबई, जयपूर, कोटा, सिकर, चेन्नई, हैद्राबाद, दिल्ली) अधिकाऱ्यांना जसे शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन आणि शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन करणाऱ्या सर्वांना असे निर्देश दिले की या शहरात शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी व आत्महत्या प्रतिबंधित करण्यासाठी काही उपाययोजना राबवाव्या. यामध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे नियमित समुपदेशन करावे, मानसिक धैर्य वाढवावे.

राष्ट्रीय टास्क फोर्स करत असलेल्या कार्याला जोडून ही तत्त्वे वाचावीत असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. ही सर्व तत्त्वे शासकीय, अशासकीय शिक्षण संस्था तसेच खाजगी प्रशिक्षण केंद्रे, कोचिंग क्लासेस सर्वानाच लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्यास मूलभूत अधिकार घोषित करुण केंद्र व राज्य शासनावर प्रत्येकाच्याच, परंतु विशेषतः विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची जबाबदारी निर्धारित केली आहे. यामुळे येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांच्या मनातील चल-बिचलता, भीती, गोंधळ, स्पर्धा कमी होऊन स्वस्थ मानसिकतेतून ते अभ्यास करतील अशी अपेक्षा आपण बाळगू शकतो.

**- प्रा. विनोद एच. वाघ**
प्राध्यापक
विप्रमंचे टीएमसी विधी महाविद्यालय, ठाणे

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

(मागील अंकाचा उर्वरित भाग पुढीलप्रमाणे...)

**''अनेक उंट असलेल्या गावात माझे लग्न कर.'' – जैसलमेरमधील एक म्हण.**

**२००६ –** वाळवंटातील स्त्रियांची कार्य आणि स्थान याबद्दल थोडेफार क्रमाने येते. त्यांच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात, विवाहित स्त्रिया कडक पडद्यात आणि घरात बांधलेल्या होत्या पण काही वेळा त्या कापणीच्या वेळी शेतात काम करत. थोडक्यात, स्त्रियांचे विश्व दोनच ठिकाणी असते. त्यांचे पीर (आईवडिलांचे स्थान) आणि त्यांचे ससुराल (सासरचे स्थान). त्यांना जैसलमेर शहराविषयी माहिती असते कारण त्यांचे पती सामान विकत घेण्यासाठी किंवा त्यांचे मुलगे शालेय शिक्षणासाठी, कामासाठी किंवा फिरायला जाण्यासाठी वारंवार बसने जातात, परंतु त्यांनी स्वतः कधीही या शहराला भेट दिली नाही.

इल्सला बऱ्याच वेळा भेटल्यानंतर, काही स्त्रियांनी तिच्या इच्छेनुसार फिरण्याच्या आणि वेगवेगळ्या ठिकाणी भेट देण्याच्या तिच्या क्षमतेबद्दल हेवा व्यक्त केला. तिने त्यांना जैसलमेर कार्यालयात भेटायला बोलावलं असले तरी, मीरा अनेक वर्षापासून काम करत असलेल्या विधवांच्या गटाशिवाय एकाही महिलेचा चेहरा तिला दिसला नाही.

जैसलमेरला जाणे हा विवाहित स्त्रियांच्या दिनचर्येचा भाग नसल्यामुळे ती व मीरा एका गावातील काही राजपूत उंट पाळणाऱ्यांच्या बायकांसाठी जैसलमेरला फक्त महिलांसाठी सहलीचे आयोजन करण्याची योजना आखतात. त्यांच्याबरोबर तिचे संबंध खेळीमेळीचे होते. पुरुषांशी संपर्क येऊ नये म्हणून ती स्वतः जीप चालवायचे ठरवते. ही एक साधी कल्पना असते परंतु त्यासाठी या स्त्रियांचे मन वळवणे काही आठवडे गरजेचे होते. तिला खात्री नव्हती की महिलांची सहल निघेल की नाही व कधी निघेल.

रविवारची सकाळ जैसलमेरला जाण्यासाठी स्वारस्य असलेल्या नवीन रंगीबेरंगी कपड्यात स्त्रिया, लहान मुले त्यांच्या हातात घेऊन तयार होतात. त्या बऱ्याच जणी होत्या; त्यामुळे त्यांनी स्टीयरिंग व्हीलच्या मागे तिच्यासाठी पुरेशी जागा सोडली नव्हती. शाळकरी वयाच्या काही मुलांच्या ओरडाआरड्यात त्या निघाल्या. ती मुले त्यांच्या आईपासून कधीच वेगळी झाली नव्हती. त्यांनी बंपरवर बसून किंवा जीपच्या बाजूला लटकून प्रवास करण्याचे ठरविले. त्यांना झटकून टाकण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागले. पण शेवटी गावातून बाहेर पडल्यावर बायका शांत झाल्या व गाणी म्हणू लागल्या आणि हशा पिकला. यामुळे त्या शहराच्या सीमेवर पोहोचल्या तेव्हा रहदारी वाढली आणि त्यांनी दुकाने आणि हॉटेल्स आणि विचित्र कमी कपडे घातलेले गोरे पर्यटक पार केले. जीप पार्क केल्यावर त्या किल्ल्यापर्यंत एकत्र समूहाने भटकल्या. तटबंदीच्या दृश्याचा आनंद घेतला, मुलांना प्राचीन तोफेवर बसवले, फोटो काढले, नाश्ता आणि चहा घेतला, निरीक्षणे केली. पर्यटकांच्या दुकानांच्या रंगीबेरंगी वस्तूंनी त्यांना आश्चर्यचकित केले. मग घरी जाण्याची आणि वाट पाहणाऱ्या पती आणि कुटुंबातील सदस्यांसाठी जेवण बनवण्याच्या चिंतेने त्यांना

घेरले. त्या पुन्हा घराकडे गाणे म्हणत निघाल्या. सर्वांसाठी हा एक संस्मरणीय कार्यक्रम होता.

हे जरी वादग्रस्त वाटले तरी, वाळवंटातील स्त्रिया सामान्यतः कमी क्षेत्रांत वावरत असल्या तरी करिअर व मातृत्वाच्या दुहेरी ओझ्याने त्रासलेल्या सरासरी अमेरिकन किंवा युरोपियन उपनगरातील स्त्रियांपेक्षा त्या जास्त आनंदी आणि आरामशीर वाटतात. मोठ्या विस्तृत जगाबद्दल ज्ञानाचा अभाव असला तरी त्या जास्त समाधानी आहेत. कारण त्यांना इतर पर्यायांची माहिती नाही, असे इल्सला वाटते.

त्या नेहमी असंख्य घरगुती कामांमध्ये व्यस्त असत त्यांची काळजी घेण्यासाठी लहान मुले आणि लहान प्राणी असतात आणि त्यांच्याबद्दल प्रेम आणि आपुलकी असते. त्या कधीही एकट्या नसतात. त्या नेहमीच एका एकत्र कुटुंबाचा भाग असतात ज्यात देवाणघेवाण आवश्यक असते. दुसरीकडे, पती बहुतेक दिवसात बाहेर असतात, त्यामुळे घरगुती गोष्टींमध्ये जास्त हस्तक्षेप करत नाहीत आणि महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या सर्जनशीलतेसाठी त्यांच्याकडे असंख्य पर्याय आहेत. त्यांची घरे वाळलेल्या चिखलात क्लिष्ट डिझाईन्सने सुशोभित करतात आणि बाभळीच्या फांद्यांपासून चुन्याने झाकलेले अप्रतिम फर्निचर बनवतात. त्या मजेशीर व खोडकर असतात. प्रचंड मोठेपणाने व उदारतेने भरलेल्या असतात. वृद्ध स्त्रियांना सांसारिक गोष्टींपासून आध्यात्मिक अलिप्तता असते (त्यांच्या मुलांचे कल्याण वगळता), मध्यमवयीन स्त्रिया आस्थेवाईक आणि सक्रिय व्यस्त असतात. त्यांचा धाकटा संच आज्ञाधारक सून किंवा घरातील खेळकर मुली म्हणून भूमिका पार पाडतात. त्यांना खात्री असते, की त्यांचे वडील त्यांच्यासाठी अनुरुप वर शोधतील. असे इल्सला साधारणपणे वाटत होते. एकंदरीत, खरा व चांगला मनाचा कौल किंवा अवस्था आणि समाधानी चेहरा सातत्यानं ठेवणं तितकं सोपं नाही असे तिला वाटते.

यांच्या विधवांची प्रकरणे वेगळी आहेत. अनेक कारगिल युद्धामुळे विधवा झाल्या. ज्यांच्या पतींना भारत आणि पाकिस्तान यांच्यातील झालेल्या भांडणात आपला जीव गमवावा लागला. इतरांनी किशोरवयातच वृद्ध पुरुषांशी लग्न केले होते. विधवा त्यांच्या किरमिजी कपडे आणि दागिन्यांच्या अभावामुळे लगेच ओळखता येतात. त्यांना समाज टाळतो व त्या पूर्णपणे त्यांच्या वडिलांवर किंवा त्यांच्या पतीच्या नातेवाईकांवर अवलंबून असतात. त्यांना बाहेर पडण्याची आणि स्वतःची उपजीविका शोधण्याची संधी नाही.

सरकारी पेन्शन, आवश्यक फॉर्म भरणे आणि सरकारी माध्यमातून ते पुढे नेणे आव्हानच आहे. मीराने ज्या कामात विशेष कौशल्य प्राप्त केले त्यापैकी हे एक होते आणि महिलांमध्ये ती इतकी लोकप्रिय का होती त्याचे हे एक कारण होते.

सर्वसाधारणपणे, काम योग्य दिशेने दिशेने चालले आहे असे दिसले, पण त्याचा भाग असलेल्या घरगुती उंट आढावा, निरीक्षण पूर्ण करण्यासाठी खूप जास्त वेळ लागला. हे आवश्यक असलेल्या प्रचंड क्षेत्रामुळे होते आणि उंटांचे मोठे कळप पाकिस्तानच्या सीमेजवळील अत्यंत दुर्गम खेड्यांमध्ये वसलेले होते. वाळूच्या ढिगाऱ्यांमुळे वारंवार दुर्गम बनलेल्या कच्च्या रस्त्यांद्वारेच ते पोहोचू शकत होते. एक परदेशी या नात्याने, ती, स्वत: विशेष परवानगीशिवाय या ठिकाणी जाऊ शकत नव्हती पण तिने, पुन्हा पुन्हा पाहिले की, विकासापासून दूर असलेले म्हणजे दूरवरच्या खेड्यांमध्ये राहणारे लोक सर्वात आनंदी आणि आदरातिथ्य करणारे होते. ही गावे फक्त स्वच्छच नव्हती, तर संपूर्णपणे मातीच्या विटांच्या इमारतींनी बनलेली पाहण्यास सुंदर होती, जी महिलांनी आत्मविश्वास आणि नेटाने व कष्टाने जतन करून दुरुस्ती आणि रंगरंगोटी केली होती.

आईस्क्रीमवर मीडियाचे लक्ष वेधून घेतल्याने उंटाचे

दूध आणि त्याच्या विशेष गुणधर्मांबद्दल स्थानिक जागरूकता वाढली होती. लोक परत-परत त्यांच्या कार्यालयात येऊन त्यांच्या दारापर्यंत दूध दररोज पोहचविण्याची विनंती करत. यात डायबिटीस असलेले वृद्ध लोक व एक तरुण होता, त्याला त्याचे शरीर निरोगी ठेवायचे होते. तसेच दिल्लीहून व इतर भागांतून फोन येत होते, ज्यांना व्यवसाय सुरू करण्यात रस होता. अशा लोकांना जोडून आणि उंटाच्या दुधासाठी जैसलमेरच्या बाजारातून दूध आणायचे होते. त्यामुळे मागणी वाढत होती. आता हजारो मादी उंट ग्राहकांच्या प्रतीक्षेत होते. ते उत्साही होते आणि उंट पाळणाऱ्यांना दररोज काही लिटर दूध विकून महिन्याला किती पैसे मिळवता येतील याचा हिशोब करून त्यांच्या उत्साहाने त्यांना उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला. घोषणा देऊन, रोज दोन लिटर दूध तुम्हांला महिन्याला जास्तीचे ६००० रु. मिळवून देतील. लोकांनी मान हलवून, त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला, की ही एक चांगली कल्पना आहे पण दूध विकण्यासाठी लोकांचा सक्रिय सहभाग नव्हता.

त्यामुळे दुधाचा एकूण व्यवहार नक्कीच सोपा नव्हता. जैसलमेरमधील उंट व्यवस्थापन प्रणाली साद्रीपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. येथे कोणतेही चुंबन घेणारे उंट नाहीत. या प्राण्यांना वर्षातून जास्त वेळ स्वत:ची काळजी घ्यावी लागते आणि दररोज त्यांना खरचटलेले तपासण्यासाठी, त्यांच्या आरोग्याबद्दल काळजी घेणारे आणि त्यांच्या खाद्याअभावी झोप न येणारे, चिंता करणारे रायका तेथे नव्हते. जैसलमेरच्या उंटांना सहसा मानवी हाताळणीची सवय नव्हती आणि वैद्यकीय हस्तक्षेप जसे की ट्रिप्स किंवा मांगे विरुद्ध इंजेक्शन जे साद्रीमध्ये एक साधी गोष्ट होती, येथे एक मोठे आव्हान होते. उंटांना पकडण्यासाठी आणि त्यांना धरून ठेवण्यासाठी खूप हुशार मनुष्यबळाची गरज होती आणि प्रत्येक उपचार ही माणूस आणि प्राणी यांच्यातील स्पर्धा असे. कोण कोणाला मागे टाकेल यावरून.

मेंढपाळ आणि उंटपालक समुदायांमध्ये काही फरक होता - कळपांकडे किती लक्ष दिले जाते, परंतु सामान्य रिवाज असा होता, प्रजनन हंगामात जो जन्माचा हंगाम देखील असतो, आणि साधारणपणे नोव्हेंबर ते मार्चपर्यंत टिकतो. इच्छित नर व माद्यांचे संबंध प्रतिस्पर्धी नरांमधील भांडणे टाळण्यासाठी आणि पिल्लाची काळजी घेतली जात आहे याची खात्री करण्यासाठी देखरेख (पर्यवेक्षण) आवश्यक असते. काही वेळा माद्यांनी योग्य काळजी घेतली नाही किंवा आई मरण पावली किंवा तिच्या लहान पिल्लाचा स्वीकार केला नाही तर अशा अनाथांना स्त्रिया हाताने वाढवतात.

मार्चपासून प्रजनन हंगाम संपल्यानंतर आणि तापमान वाढू लागल्यावर, उंटांना मुक्तपणे वावरण्यास सोडले जाते. काही पशुपालक तरूण उंटांना दिवसा काटेरी कुंपणात ठेवतात व खात्री करतात की त्यांच्या आया संध्याकाळी परत येतील. पण हळूहळू त्यांच्यातले बंध कमी होत जाताच. मादी उंट छोट्या मुख्यतः आई, मुलगी आजी अशा कळपात विखुरतात. नर उंट एकटे पडतात.

पहिला पाऊस पडला की, पेरणी केलेल्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून उंट गोळा करावे लागतात. अनेक माद्या स्वतःहून परत येतात; स्थानिक कथेनुसार, जेव्हा ते त्यांच्या गावांच्या दिशेने मेघगर्जना आणि वीज पाहतात तेव्हा त्या परत येतात. त्या ज्या ठिकाणी पाऊस पडला आहे त्या ठिकाणांचा शोध घेतात, वरवर पाहता ते त्यांच्या वासाच्या संवेदनेद्वारे लांब अंतरावर शोधण्यात सक्षम असतात. शास्त्रज्ञांच्या मते, पाऊस पडतो तेव्हा स्ट्रेप्टोमायसिस बॅक्टेरियाद्वारे तयार होणारा जिओस्मिन हा पदार्थ जाणण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

जे उंट स्वेच्छेने परत येत नाहीत त्यांना सामूहिक रीतिने घरी आणले जाते ज्यामध्ये सर्व उंट पाळणारे सामील होतात. मालकीचा विचार न करता, प्रत्येक जण त्याच्या समोर येणारा प्रत्येक उंट गोळा करतो

आणि नंतर त्याला किंवा तिला मध्यवर्ती ठिकाणी आणतो. प्रत्येक प्राण्याला गाव-विशिष्ट किंवा अगदी मालक-विशिष्ट ब्रँड असतो, नंतर ते सहजपणे वेगळे केले जातात.

जर योग्य पाऊस झाला तर सर्व काही ठीक आहे आणि कळप त्यांच्या गावाच्या परिसरात चरतात, परंतु जर नसेल तर त्यांना पुन्हा मोकळे सोडावे लागेल, कारण त्यांच्या अन्नाच्या शोधात नियंत्रण करणे अशक्य आहे.

जैसलमेरचे उंट अर्धवट जंगली अवस्थेत ठेवले आहेत हे त्यांच्या लक्षात येताच, त्यांच्या मनात दुधाच्या व्यवहार्तेबाबत दुसरे विचार येऊ लागले. अशा परिस्थितीत उंटाच्या दुधाची महत्त्वपूर्ण वाढ व संकलन करणे वास्तववादी आहे का? त्यांनी नॅन्सी अबेडराहेमन या तज्ज्ञ महिलेचा सल्ला घेण्याचे ठरवले. तिने एक दशकापूर्वी, मारटियानामध्ये 'तिव्हिस्की' दुधाची डेअरी अनेक अडथळ्यांना पार करून चालू केली होती. ते तिच्या बरोबर अनेक भागांत फिरून उंट पालकांना भेटले. शेवटी तिने तिचे मूल्यांकन इल्सने बोलावलेल्या कार्यशाळेमध्ये दिले. तेव्हा अनेक महत्त्वाच्या व्यक्ती हजर होत्या. त्यांनाही उंटाच्या दुधाच्या विक्रीबद्दल उत्सुकता होती. तिच्या मते राजस्थानमध्ये मारटियानापेक्षा जास्त चांगल्या सुविधा होत्या; त्यामुळे दूध संकलन व विक्री जास्त सोपी होती, पण तिने असेही सांगितले की, दूध थंड करायच्या टाक्यांसाठी खूप मोठी गुंतवणूक लागेल. गोष्टी खूप आशादायी दिसत होत्या.

पण थर वाळवंटांत प्रगती खूप हळू होती. त्यांच्या कर्मचाऱ्यांनी कठोर मेहनत केली. वाळवंटातील पांढरे सोने पहाटे निर्मात्यांकडून मोटारसायकलने गोळा केले, नंतर संकलन सेट केले आणि ते कार्यालयाच्या स्वयंपाकघरात पाश्चराइज केले, ते प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरले व शेवटी डझनभर लोकांना ज्यांना उंटाच्या दुधाची आवड होती अशांना दिले.

पण मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाजूंनी खूप अडथळे येत होते. कधीकधी दूध मिळत नव्हते किंवा संपत होते. ग्राहकांनी तक्रार केली की त्यांच्या सकाळच्या चहासाठी ते खूप उशिरा आले. त्यांना ते लवकर हवे होते. ग्राहकांमध्येही सतत चढ-उतार होत होता. काही जण बाहेर पडत होते आणि काही नवीन सामील झाले. ते दररोज ३०लि. जास्त दूध विकत नव्हते.

उंटांचा जंगलीपणा, प्रकल्पांतील नावीन्य वाहतुकीतील समस्या, कधीकधी असह्य उष्णता आणि वीज बंद होणे या सर्व अडथळ्यांचा विचार करून, या टप्प्यावर यापेक्षा जास्त अपेक्षा करता येणार नाही असे त्यांना वाटले. परंतु त्यांना मदत करणारे खूश नव्हते. त्यांनी गुजरातमधील म्हशीच्या दूध उत्पादकांच्या दुसऱ्या प्रकल्पातील आकडेवारी उद्धृत केली, जिथे नफा मिळविण्यासाठी दररोज किमान १,००० लीटर आणि जास्तीत जास्त ३,००० लिटर उलाढाल करावी लागते. त्यांनी युक्तिवाद केला की दूध एवढ्या प्रमाणात तयार होण्यासाठी वेळेची गरज आहे आणि उंटाचे दूध हे गाय आणि म्हशीच्या दुधासारखे मोठ्या प्रमाणात बाजारातील प्रस्ताव नाही तर औषधी आणि आरोग्य फायदे असलेले महत्त्वाचे उत्पादन आहे. त्यामुळे, ते जास्त किंमत निर्माण करू शकते आणि कमी प्रमाणात फायदेशीर बनवू शकते.

असो, आणखी एक अनपेक्षित अडथळा होता ज्याचा अनुभव त्यांना एका थंडगार सकाळी आला. जेव्हा त्यांच्या मुख्य दूध पुरवठादारांपैकी एकाकडे सकाळी दूध काढण्यासाठी वेळेत पोहोचले. तो, त्याचे पाच भाऊ आणि त्यांची कुटुंबे मध्यभागी असलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर एका छोट्याशा गावात राहत होती. ते तिथे पोहोचलो तेव्हा पूर्वेला लुकलुकणारा प्रकाश सोडला तर अजून उजाडले नव्हते. सगळे झोपलेले होते. एका भावाने त्यांना बैठकीच्या खोलीत बोलावले.

यश मिळवण्यासाठी नाही म्हणणाऱ्यांचं ऐकू नका.

दूध अजून गोळा झाले नव्हते. त्यांना घाई नव्हती. नंतर कधीतरी, तीन ब्लँकेट पांघरलेल्या व्यक्ती उतारावरून खाली आल्या, तिथे अनेक उंट गोळा केले होते. तरूण उंट आक (aak tree) झाडाच्या वाळलेल्या खोडापासून बनवलेल्या छोट्याशा आवारात बंदिस्त ठेवले होते.

दूध देणारे उंट कदाचित त्यांना घाबरतील म्हणून त्यांच्या मागे न येण्यास सांगण्यात आले. उंटांना एका व्यक्तीने धरून शांत केले, तर दुसऱ्याने दूध काढले आणि तिसऱ्याने वासराचे व्यवस्थापन केले. ज्याची उपस्थिती दुधाचा प्रवाह येण्यासाठी आवश्यक होती. सहा उंटांचे दूध काढण्यासाठी सुमारे तीस मिनिटे लागली ज्यांनी मिळून सुमारे २० सि. दूध दिले.

या विस्तारित कुटुंबासाठी आर्थिकदृष्ट्या उंटांचे दूध फायद्याचे ठरले. त्यांनी गेल्या दोन महिन्यांत सुमारे २०,००० रुपये मिळवले होते. जास्तीच्या मिळकतीमुळे त्यांना थकित कर्जाची परतफेड करता आली. त्या उंट पालनकर्त्यांनी आणखी एक कप चहा पिण्याची विनंती केली. दूध पाश्चराइज्ड आणि वाट पाहणाऱ्या ग्राहकांना वितरित करण्यासाठी इल्स अधीर झाली होती. तिला व स्थानिक देणगीदारांना, हे खूप छान वाटले की गरीब लोक आणि उंटांचे दूध विकून पैसे मिळवत होते. पण त्यांच्याशी झालेल्या संवादातून हे स्पष्ट झाले की प्रत्येक भाऊ वेगवेगळ्या स्त्रोतांमधून जास्तीचे पैसे मिळवत होता. एक शेती उत्पादनातून, एक मेंढ्या आणि शेळ्यांमधून, एक गाईंच्या लहान दुधव्यवसायातून व एकाला आर्मीचे पेंशन होते. म्हणून हे लोक गरीब नव्हते व स्वतःला गरीब समजत नव्हते. त्याच्याकडे अनेक प्रकारची संसाधने होती. त्यांचा जीवनावश्यक खर्च खूप कमी होता. उदा. त्यांचा जेवणाचा खर्च खूप कमी होता. ते त्यांची भरड धान्ये स्वतः पिकवत व गाईंपासून भरपूर ताक व तूप मिळवत. खैर, कुंबत, खेजरी इत्यादी वाळवंटातील झाडांपासून ते फळे व शेंगा मिळवत व त्यापासून चविष्ट भाज्या बनवत. कधी रोख रकमेची गरज भासली तर मेंढ्या विकून पैसे मिळवत. मेंढ्यांच्या मांसाला खूप जास्त मागणी होती. हे उघड होते की या मेंढपाळांकडे , त्याच्या गरजा भागविण्यासाठी सर्वकाही होते. म्हणून स्वतःला जास्त त्रास देऊन सकाळी लवकर उठून अनुत्सुक उंटांचे दूध काढायची तसदी कशाला घ्यायची?

अशा वेळी इल्सला वाटले की, वाळवंटातील गरीबी हे एक मिथक आहे किंवा परदेशी शोध.

काही काळानंतर, 'कॅमल ब्रिडर संघटनेचा' अध्यक्ष, भोमसिंग यांच्याशी झालेली चर्चा डोळे उघडणारी ठरली. भोमसिंगला त्याचा दिवस पोखरणमधील चहाच्या स्टॉलवर त्याच्या मित्रांसोबत व संबंधितावरोबर स्थानिक घडामोडींवर चर्चा करणे व दूरवर पसरलेल्या त्यांच्या धंद्याविषयी चर्चा करण्यात घालवायला आवडे. त्याने इल्स व इतरांना त्याच्या पोखरण जवळील घरी घेऊन गेला. जिथे जाण्याचा रस्ता वालुकामय होता. तिथे त्याने त्यांना त्याच्या चौकोनी, काळोख्या अथिती 'कक्षात' (गेस्टरूम) मध्ये नेले. त्या जागेचा दुहेरी उपयोग होता. तेथे एका कोपऱ्यात तुटलेल्या चारपाई व शेतीची अवजारे रचून ठेवली होती. त्याना जड व जाडीभरडी ब्लँकेटस गुंडाळून पाठीला आधार म्हणून व थंडीपासून संरक्षण करण्यासाठी देण्यात आली.

ते अशा पद्धतीने बसल्यावर भोमसिंगने तरुण, सडपातळ धावपळ करणाऱ्या समुदायाला चहा देण्याची आज्ञा केली. नेहमीप्रमाणे अफूचे तुकडे वाटल्यावर, भोमसिंग टेकून बसला व बोलायला तयार झाला. त्यांना त्याच्याकडून जाणून घ्यायचे होते की गेल्या पन्नास वर्षांत जीवन कसे बदलले आहे.

मी लहान असताना, माझ्या कुटुंबाचा चरितार्थ डाकू म्हणून होता. आम्ही सिंधमध्ये उंट चोरत होतो.

नंतर ते आम्ही पोखरण परिसरात किंवा बारमेर येथे बाजरीच्या बदल्यात विकायचो. आमच्या जनावरांचे उत्पादन - तूप, दूध आणि ताक होते. त्या काळात पाणी दुधापेक्षा दुर्मीळ होते. त्या काळात आम्हांला क्वचितच भाकरी मिळे व अनेक आठवडे आम्ही उंटाच्या दुधावर राहत होतो. आम्ही १९७४ मध्ये बाजरी पिकवायला सुरुवात केली आणि बाजरीचे एक पोतं वर्षभर पुरवावे लागे. कधीकधी बाजरीचं पीठ मटीरा (खरबूज) आणि तुंबाच्या बियांमध्ये मिसळायचो. (एक जंगली लता) दुष्काळाच्या काळात, खेजरी आणि खैर झाडांच्या सालीपासून पीठ बनवण्याचा प्रयत्न केला, जेव्हा ते खरोखरच खराब झाले, तेव्हा संपूर्ण गाव सिंधमध्ये स्थलांतरित झाले व तेथे आम्हाला काम मिळाले. सांगरिया, खेजरी झाडाच्या शेंगा आणि पिलू, झाडाची फळे आमच्यासाठी खूप महत्त्वाची होती तो थांबला आणि तिने त्याला विचारले आणि चहाचं काय? कधी ओळख झाली? अरे, चहा - जे फक्त पन्नास वर्षांपूर्वी सुरू झाला आणि ते कधी घडले ते मला अजूनही चांगले आठवते. माझ्या आईला हे वाळलेले काळे तुकडे काय आहेत हे माहीत नव्हते आणि तिला ही वाळलेली भाजी वाटली, म्हणून तिने चहाची पाने तळून त्यापासून टेका गार्निश बनवले.

मग तुम्हाला कोणत्या वस्तू विकत घेत होता? असे विचारल्यावर तो म्हणाला, ''आम्हाला तिखट, मीठ, तिळाचे तेल, साखर आणि काड्यापेट्या विकत घ्याव्या लागायच्या. अफू खूप जुनी आहे, आम्ही ती अनेक पिढ्या वापरली आहे पण दारू पिणे हे ठाकूरांच्या जमीनदारांपुरते मर्यादित होते; सामान्य लोकांनी तिचा वापर केला नाही.''

एक-दोन तासानंतर, तरुणांनी जेवणाच्या ट्रेमध्ये गाईंपासून भरपूर घरगुती तूप आणि हिरव्या चटणीसह बाजरीची रोटी आणली. ते चवदार आणि निरोगी होते. तिला वाटले ते उत्कृष्ट आणि सर्वात समाधानकारक जेवण होते. तेलाच्या फडफडणाऱ्या दिव्याच्या प्रकाशात भोमसिंगच्या कथा ऐकताना काळजी घेणारे, अदबशीर सेवक त्यांच्याभोवती घिरट्या घालत होते. भिंतीच्या पलीकडे तूप देणाऱ्या गाईं रवंथ करत होत्या आणखी काय हवे असते आयुष्यापासून - तिला खात्री वाटते की, ते यापेक्षा अधिक चांगले असूच शकत नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी, त्यांना पुन्हा छान जेवण देण्यात आले. भोमसिंगने त्यांना एक दगडाची खाण दाखवली जी त्याची जमीन होती. त्याच्या खाली ग्रेनाइट सापडले होते, त्याची किंमत करोडो रुपये होती. पण, दूध गोळा करण्यासाठी आम्ही धानीमधल्या उंटपालकांना दूध गोळा करायला भेट दिली होती, त्यांच्याप्रमाणेच तो या विकासाबद्दल उत्साही नव्हता - जर काही असेल तर ही नवीन परिस्थिती कशी हाताळायची याबद्दल तो गोंधळलेला होता. त्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे म्हणजे, बसणे, चांगले बोलणे, शहाणपणाच्या गोष्टी सांगणे, अफूच्या आस्वाद घेणे. पैसे जमा करण्यापेक्षा त्याच्या जातीच्या आणि इतरांच्या आदराचा आनंद घेणे.

तिच्यासाठी हे संवाद डोळे उघडणारे होते. प्रजनन करणारे कणखर होते, संवेदनक्षम व कष्टांची सवय असलेले लोक होते. ते भौतिकवादी नव्हते आणि वैयक्तिक चैन, ऐश, आरामाबद्दल अनास्था असलेले होते. ते त्यांच्या परिस्थितीत खूप आनंदी होते. (पत्नी आणि स्वतःच्या विभक्त कुटुंबाची तीव इच्छा असणारे पदवीधर वगळता) त्यांच्या जगण्यासाठी लागणाऱ्या गरजा त्यांच्या जनावरांपासून अथवा निसर्गातून पुऱ्या करत होते. जर लोक खरोखरच त्यांच्या खिशात काही जास्त रोख रकमेच्या संधीसाठी स्वत: फारसे प्रयत्न करणार नसतील, व ते फारसे मनावर न घेता, जीवनाचा आनंद घेण्यास प्राधान्य देत असतील तर उत्पन्न देणारे दूध बाजारत त्यांना कसे मिळेल? त्याशिवाय, उंटाचे

दूध उद्योग चालू ठेवण्यासाठी कूलिंग टँक आणि पात्र डेअरी तज्ज्ञांसाठी भरीव गुंतवणूक कुठून येणार? त्यांनी एक उत्पादक समाज निर्माण करण्याचा विचार केला होता आणि उंट उत्पादकांनी आधीच स्वयं-सहायता गटांच्या क्लस्टरमध्ये संघटित केले होते आणि नियमित बचत करत होते. राजस्थान डेअरी को-ऑपरेटिव्हने जयपूर परिषदेत दिलेल्या पाठिंब्यासाठी कधीही पुढे आले नव्हते. वसुंधरा राजे पुन्हा निवडून आल्या नव्हत्या आणि विद्यमान मुख्यमंत्र्यांना उंटासाठी काही करण्यात अजिबात रस नव्हता.

LPPS कडून मिळणाऱ्या इतर प्रकारची मदत व आरोग्य सेवा याशिवाय उंट पाळणाऱ्यांना दुधाच्या व्यवसायामध्ये फारच कमी रस होता हेही उघड सत्य होते. त्यांच्यासाठी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे चोरी आणि अपघातावर प्रतिबंध. दोन्ही कारणांमुळे नुकसान जास्त होते, कारण चोर गूपचूप फिरत होते आणि नियमितपणे उंटांना राज्याबाहेर ट्रक करून ते शेजारच्या उत्तर प्रदेशातील मांस मार्केटमध्ये नेत होते. LPPS ची उपस्थिती आणि जैसलमेर कॅमल ब्रीडर्स असोसिएशनच्या निर्मितीने या उपक्रमांवर आधीच नियंत्रण ठेवले होते. कारण त्यांना वाटले की या मजबूत संस्था लढा देतील. रस्त्यावर आणि रेल्वे ट्रॅकवर तसेच सैन्याच्या शूटिंग रेंजमध्ये उंट भरकटल्याने अपघात झाले होते. त्यांच्या कर्मचाऱ्यांनी एक कृतिदल स्थापन केला होता

अपघातात गुंतलेल्या उंटांच्या चालकांचा पाठलाग करण्यासाठी आणि भरपाईचे पैसे काढण्यात यशस्वी झाले; ज्यामुळे उंट उत्पादकांना आनंद झाला. त्यांनी वाहनचालकांना उंटांनी रस्ता ओलांडण्याबाबत सूचना देणारे फलकही लावले होते. अरेरे, ते देखील शेवटी चोरीला गेले - स्क्रॅप मेटलच्या किमती जास्त आहेत.

त्यांच्या प्रकल्पाच्या शेवटी, २००६ मध्ये प्रकल्पाच्या प्रारंभी तपासलेल्या १० टक्के घरांच्या परत केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले की गेल्या चार ते साडेचार वर्षांत कळपांच्या आकारात २६.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याला सरकारी पशुधन सर्वेक्षणाने दुजोरा दिला ज्यात असे दिसून आले की जैसलमेर हा राजस्थानमधील एकमेव जिल्हा आहे ज्यामध्ये उंटांची संख्या कमी झाली नाही, परंतु प्रत्यक्षात वाढली आहे. जैसलमेर कॅमल ब्रीडर्स असोसिएशनच्या सदस्यांना हे का घडले याबद्दल कोणतीही शंका नव्हती. एक म्हणजे, ट्रायपॅनोसोमियासिस आणि मांगेच्या उपचारांसाठी अस्सल औषधांची उपलब्धता होती. मॅनगेचा उद्रेक मोठ्या प्रमाणात नियंत्रित केला गेला होता. आणखी एक मुद्दा, २ उंट चोरी आणि अपघातांचे खटले होते. उंटाबद्दलची त्यांची बदललेली धारणा अधिक मानसिक होती. पूर्वी, उंट पालनाकडे मागासलेला व ऱ्हास होणारा व्यवसाय म्हणून पाहिले जात होते. पण, उंटाच्या दुधाभोवतीच्या सर्व आरड्या ओरड्याने त्यांना वाटले की ते भविष्यासाठी आर्थिक क्षमता असलेल्या धंद्यात पडले आहेत. त्यामुळे उंटांची काळजी घेणे आधिक चांगले होते.

त्यांनी कबूल केले की त्यांचा दूध विक्री प्रकल्प जैसलमेरमध्ये अयशस्वी झाला. त्यांनी उत्सुक आणि सहाय्यक देणगीदारांना निराश केले. तरीही त्यांना असे वाटले की ते योग्य मार्गांवर होते. उंटाच्या दुधाची खरेदी विक्री त्याचा नाशवंतपणा व पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कठीण असली तरी इतर उत्पादने, लोकर आणि उंटाचे शेण यांचा उपयोग करू शकतात. पण हे काम साद्री येथून देखील होऊ शकते जिथे वेळ देखील थांबला नव्हता.

**- सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पिटल
ठाणे
भ्रमणध्वनी - ९८३३०२९३५६

●●●

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले प्रतापगड

*महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतीक, मराठ्यांच्या शौर्याचा साक्षीदार आणि शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले प्रतापगडाचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यात आला आहे. त्याचीच माहिती आपण या लेखात पाहणार आहोत. – संपादक*

**किल्ले प्रतापगड**

महाबळेश्वराच्या जटांत आणि जावळीच्या रडतोंडीच्या घाटात एक शिवनिर्मित दुर्ग उभा आहे. नाव त्याचं प्रतापगड. याच गडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरचा आदिलशाही सरदार अफझलखानाचा वध करून जो इतिहास घडवला, त्याला तोड नाही. अशा त्या शिवप्रतापी किल्ल्याची व त्याच्या साक्षीने झालेल्या त्या समराची माहिती थोडक्यात या लेखात दिली आहे.



**प्रतापगडाचे मनोहारी दर्शन**

दि. १५ जानेवारी १६५६ रोजी शिवाजीराजांनी जावळी जिंकली. आकाशाला टेकू देणारे सुळके, पाताळात गेलेल्या घळ्या, घनदाट जंगल आणि चांभारगड, सोनगड, चंद्रगड, मकरंदगड आदिंच्या तटबंदीने सुरक्षित असलेला जावळीचा मुलुख राजे पहात होते. पाठीशी महाबळेश्वर उभा होता. अशा त्या मुलुखात जावळी शेजारील भोरप्या डोंगराकडे राजांचे लक्ष गेले. मोरोपंत पिंगळे यांना राजांनी बोलावले. ते म्हणाले, ''मोरोपंत ! या भोरप्या डोंगरावर तुम्ही किल्ला असा बांधा की कोणत्याही बाक्या प्रसंगी आम्हाला या गडाची आठवण व्हावी. ती जबाबदारी तुमची ! तुळजापूरला जाऊन भवानी मातेचं दर्शन घेणं आम्हाला जमत नाही. या सुरक्षित स्थानी देवीची स्थापना करावी, असं आमच्या मनात आहे.''

मोरोपंत कामाला लागले. छन्नी-हातोडे चालू लागले. सुरुंगांची पेरणी झाली. आखल्याप्रमाणे चिऱ्यावर चिरे चढू लागले. तट-बुरुज आकाराला येऊ लागले. पाथरवट-बेलदार-गवंडी-लोहार-सुतार कामाला लागले. डोंगरमाथ्यावर जाईच्या जाळीखाली एक स्वयंभू शिवलिंग सापडले. त्याची त्याच जागी स्थापना केली. त्या गडदेवतेला केदारेश्वर असं नाव मिळालं. लहानसा महाल, सदर तयार झाले. सुमारे दोन-अडीच वर्षे हे काम सुरु होतं. राजांनी गडाचं नाव ठेवलं 'प्रतापगड'. अशातच विजापूरमध्ये असणाऱ्या समर्थांच्या शिष्यांनी अफझलखान निघाला आहे, असा श्लोक स्वरुपातील संदेश गुप्तपणे पाठवला.

**विवेके करावे कार्यसाधन, जाणार नरतनू हे जाणोन ।**
**पुढील भविष्यार्थी मन, रहाटोची नये ।।१।।**
**चालो नये असन्मार्गी, सत्यता वाणल्या आंगी ।**
**रघुवीर कृपा ते प्रसंगी, दास महात्व वाढवी ।।२।।**
**रजनीनाथ आणि दिवाकर, नित्यनेमे करिता संचार ।**
**घालाताती येरझार, लाविले भ्रमण जगदीशे ।।३।।**

**आदिमाया मूळ भवानी, हेची जगताची स्वामिनी ।**
**एकांती विवेके धरोनी, इष्ट योजना करावी ।।४।।**

या ओव्या वाचल्या तर त्यातून लगेच फारसं काही हाती लागत नाही. परंतु पहिल्या १४ ओळींमधील पहिले अक्षर घेतले तर 'विजापूरचा सरदार निघाला आहे' असा गूढ संदेश मिळतो आणि शेवटच्या दोन ओळीत, 'एकट्याला गाठून विवेकाने म्हणजे दु:साहस न करता, योग्य तेच करावे, असेही म्हटले आहे. शिवबांनी या मागचा कर्ता - करविता कोण? हे लागलीच ओळखले आणि हा आदेश कार्यान्वित करण्यासाठी लगोलग राजगडावरुन थोड्याशा शिबंदीसह प्रतापगडाकडे कूच करते झाले.

जावळीची पागा आणि छावणी पाहून गडावर यायला राजांना संध्याकाळ झाली. महादरवाज्याच्या थोडे अलीकडे माणकोजी दहातोंडे व मोरोपंत उभे होते. त्यांना बघताच राजे पायउतार झाले. राजे सर्वांसह पायऱ्या चढत होते. नजर गडावरून जात होती. चौक्या-पहारे बसले होते. पश्चिमेकडून महादरवाज्यापर्यंत चक्राकार वाटेने जाताना राजांच्या लक्षात आले की ही वाट मुद्दामहून अरुंद ठेवली असून शत्रू हत्ती घेऊन इथवर आलाच तर तो हत्ती इथून सहजी आत जाऊ शकणार नाही आणि जर तो मारला गेलाच तर तो येण्याची वाट अडून शत्रुच्या अडचणीत भरच पडेल, अशी ती योजना. इथून पुढे असणारी जागा म्हणजे जणू काही दारापुढचं अंगण! तिथवर शत्रू आलाच तर त्याला पाठीमागून, पुढून बाण नि बंदुकीच्या गोळ्या झेलतच दरवाज्यापर्यंत यावे लागणार आणि शत्रुचं तोंड आतापर्यंत दोन - चार वेळा उलटसुलट फिरून राहिलेलं असेल. आता राजांनी डोळे भरून दरवाज्याच्या कमानीच्या डाव्या-उजव्या बाजूला गड संरक्षण सत्तेचं प्रतीकं मानली जाणारी दोन व्याल शिल्पे न्याहाळली. महाद्वार ओलांडून राजांनी त्यानंतरच्या दुसऱ्या व तिसऱ्या दरवाजांना ओलांडून लहानशा मंदिरातील स्फटिक शिवलिंगाचं दर्शन घेतलं. हे शिवलिंग सव्वा फूट लांब, आठ इंच रुंद व फुटभर उंचीचे असून ते पारदर्शक नि लखलखीत तर आहेच, पण आश्चर्य म्हणजे त्यापुढे कापूर लावून बाकीचे दिवे बंद करून काळजीपूर्वक बघितले तर त्यात बेलाचे पान, तुळशीचे पान आणि गंगा अगदी स्पष्ट दिसते. इथून पुढे राजे बालेकिल्ल्याचा चढ चढू लागले. बालेकिल्ल्याच्या महाद्वारातून आत शिरताच डाव्या हातास अंदाजे ५० फूट लांब व १५ फूट रुंद आयताकार सदर व त्याच्या अगदी समोर असलेल्या केदारेश्वर मंदिरास भेट देत अंमळ बसून मनोभावे लिंगाची पूजा करीत प्रार्थना केली. त्यानंतर राजे वाड्याकडे वळले. प्रतापगडाच्या अगदी उंच जागेवर मोरोपंतांनी वाडा बांधला होता. वाडा आकाराने लहान पण सुबक होता. सुरुदार खांबांनी दर्शनी भाग सजला होता. पुढच्या चौकावर माडी होती.

दुसऱ्या दिवशी आन्हिकं आटोपून शिवबा तटबंदीवरून फिरु लागले. तिथल्या राजपहाऱ्याची दिंडी बघतांना त्यावरील घोरपडीचे शिल्प निरखत पुढे रेडका बुरुज, उत्तरेचा यशवंत बुरुज, त्या जवळची दोन तळी, ईशान्येकडील चोरवाट करत राजे खालच्या तटबंदीतील सूर्यबुरुज व मारुतीच्या मंदिरात आले. खाशा समर्थांनी प्राणप्रतिष्ठा केलेल्या हनुमंताची त्यांनी मनोभावे पूजा केली. नंतर टेहळणी बुरुजावरुन समोरचा महाबळेश्वर व आसमंतावर नजर टाकीत मोरोपंतांना लांब पल्ल्याच्या तोफा कुठे ठेवाव्यात आणि त्यास लागणारा दारुगोळा काळजीपूर्वक बंदोबस्त करून कुठे व कसा ठेवावा याचे मार्गदर्शन केले. दाणागोटा, वैरण आणि शस्त्रे यांची तजवीज करुन तयारीत राहण्यास कथन केले.

प्रचंड सेना घेऊन अफझलखान विजापूरहून निघाला. मात्र सरळ रस्त्याने शिवराज्यात प्रवेश करण्याऐवजी वाट वाकडी करून मराठ्यांची श्रद्धास्थाने उद्ध्वस्त

करीत जायचे त्याने ठरविले. त्यामुळे शिवाजीराजे कदाचित खवळून उठतील आणि झुंझावयास येतील, मग ते अनायास कचाट्यात सापडतील, हा त्याचा होरा. खानाने आपला मोर्चा तुळजापूरावर वळवला. श्री. भवानीची मूर्ती स्वतः घण घालून मोडली. देवीपुढे गाय मारली. नंतर अफझलखान पंढरपूरकडे निघाला. विठ्ठलाच्या मंदिरालाही तोशीस लागली. त्याने तेथे थैमान घातले. पण पांडुरंगाची मूर्ती लपवली गेल्याने बचावली. तरीही शिवाजीराजे काही सह्याद्रीतून बाहेर आले नाहीत. उलट, शिवबाराजांनी राजगड सोडून प्रतापगड गाठला. जावळीच्या त्या घनदाट अरण्यात खानाला खेचायचं-त्याच्या संख्याबळावर-शस्त्रबळावर-शक्तिबळावर आपल्या बुद्धिचातुर्याने मात करायची राजांनी ठरविले. स्वतः भ्यायल्याचं भासवीत शिवराय भेटीसाठी खानाला स्वतःच्या शर्तीवर जावळीच्या निबिड अरण्यात प्रतापगडापाशी बोलवत होते. त्या वेळी खान जवळच असलेल्या वाईला तळ ठोकून होता. राजांच्या अटी मान्य करीत अफझलखान त्या गोष्टींना तयार झाला. प्रतापगडाच्या अर्ध्या चढणीवर, एका सपाटीवर खानाची भेट घेण्याचे ठरले. भेटीसाठी आलिशान शामियाना सजला. भेटीच्या वेळी दगाफटका करायला अधीर झालेला अफझलखान शामियान्यात दाखल झाला. प्रतापगडावरुन खान आलेला पाहून राजे केदारेश्वराला नमन करून गडउतार झाले. शामियान्यात नजरानजर होऊन गळाभेटीचा कार्यक्रम सुरु झाला. त्या बहाण्याने खानाने राजांची मान काखेखाली घेत त्यांच्या मस्तकावर वार केला. पण धीर धरत राजांनी वाघनखे खानाच्या पाठीत रोवली. खानाची पकड ढिली झाली आणि संधीचा फायदा घेत शिवबांनी कट्यार काढून खानाच्या पोटात खुपसून ती आडवी ओढली. खानाचा कोथळा बाहेर आला. दगा-दगा असा खान जोरात ओरडला. नंतरच्या धुमश्चक्रीत खान व त्याचे सहकारी मारले गेले. राजांनी तत्काळ गडावर पोहचत तोफा उडवण्याचे निर्देश दिले. तोफांचा आवाज कानी पडताच लपून बसलेल्या मावळ्यांनी 'हरहर महादेवा' च्या घोषात विजापूरी सैन्यावर चौफेर हल्ला चढवत अफझलखानाच्या फौजेचा धुव्वा उडवला. प्रतापगडावरील सेनेवर सिलीमकर व बांदल, जावळी-वाई मार्गावरील फौजा नेताजी पालकर तर पारघाटावरील फौजांवर मोरोपंत यांनी एकाचवेळी मारा करून आदिलशाही फौज नेस्तनाबूत केली.

आपण निवडलेल्या जागेवर शत्रुला खेचून आणणं, यातच निम्म यश सामावलेलं असतं. या राजकारणात यशाचं पुरेपूर माप शिवाजीराजांच्या पदरात पडलं. नुसता अफझलखानाचा वध करून हे दुष्टदमनचक्र थांबले नाही तर वीस हजार शाही फौजेचा धुव्वा उडवला गेला. अख्ख्या भारतवर्षाला प्रचंड हादरा बसला. तो दिवस होता १० नोव्हेंबर १६५९. या अभूतपूर्व विजयानंतर अवघ्या १५ दिवसांत मराठ्यांनी वाईपासून सातारा, कराड-करवीर पावेतो साराच मुलुख हिंदवी स्वराज्याचा भाग बनवला. करवीर ताब्यात घेऊन शिवराय शहरात शिरले तो दिवस होता मार्गशीर्ष वद्य ६, शके १५८१ म्हणजे २५ नोव्हेंबर १६५९ तर बुलंद - बेदाग - बळकट नि बलाढ्य पन्हाळा मिळवला तो दिवस होता २८ नोव्हेंबर १६५९. अवघ्या अठरा दिवसात ११ किल्ले स्वराज्यात दाखल झाले. दाभोळ पर्यंतचा मुलुख शिवराज्यात सामील झाला. शिवरायांची ही विजयी दौड अनपेक्षित अन् अतर्क्य अशीच होती.

**सरित्पतीचे जल मोजवेना । माध्यान्ही भास्कर पाहावेना।।**
**मुठीत वैश्वानर बांधवेना । तैसा शिवाजी जिंकवेना।।**

अशी अनोखी कलाटणी अफजलखानाच्या मृत्यूनंतर मिळाली. प्रतापगड म्हटलं की, हे सारं ध्यानी येतं.

शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर शिवपुत्र संभाजीराजे गादीवर आले. त्यांनी २३ ऑगस्ट १६८० रोजी

प्रतापगडावरील श्री भवानी देवीला दहा हजार होनांची सनद दिली. त्यांना संगमेश्वरी मुगलांनी पकडून नेल्यानंतर १७ वर्षाचे राजाराम महाराज आणि फारतर पंचविशी गाठलेल्या येसूबाई रायगडावर होते. सगळा परिवार एकत्र राहणे धोक्याचे, म्हणून राजधानी रायगडावर राजमाता येसूबाईसाहेब आणि युवराज शिवाजी (शाहू) राहावेत आणि राजाराम महाराजांनी गड सोडून जावे, अशी मसलत झाली. त्यावेळी इतिकतखानाचा वेढा रायगडावर पडत होता. वेढ्यातील ढिलाईचा फायदा घेत राजाराम महाराज व काही निष्ठावंत वाघ दरवाजातून निसटून दिनांक ५ एप्रिल १६८१ रोजी प्रतापगडावर दाखल झाले. प्रतापगड सोडताना राजारामांनी गडावरील श्रीभवानी देवीची मूर्ती सुरक्षिततेसाठी गडावरुन खाली हलविण्यास सांगितले. राजारामापाठोपाठ आलेल्या मोगल सैन्याने प्रतापगड जिंकला. अवघे चाळीस दिवस हा किल्ला त्यांच्या ताब्यात राहिला. लगेचच रामचंद्रपंत अमात्यांनी तो सोडवून घेतला. त्यानंतर हा किल्ला कधीही मोगलांच्या ताब्यात गेला नाही. प्रतापगडावरील श्रीभवानीची मूर्ती शिवबाराजांनी नेपाळातील गंडकी, श्वेत गंडकी आणि सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावरुन शिळा आणून निष्णात शिल्पीकडून तयार करवून अफझलखान वधानंतर इ. स.१६६१ च्या ललिता पंचमीच्या दिवशी मोरोपंताच्या हस्ते स्थापन केली. मंदिराच्या गाभाऱ्यात सेनाप्रमुख हंबीरराव मोहित्यांची तलवार ठेवली असून बाजूलाच एका कोनाड्यात आणखी एका देवीची मूर्ती आहे. तिला ऐंद्रिय भवानी असे संबोधले जाते. ती तुळजापूरच्या मूळ मूर्तीची हुबेहुब नक्कल आहे. श्रीभवानीच्या पुढ्यात शिवबांना प्रिय स्फटिक शिवलिंग आहे.

प्रतापगड आणि अफझलखान प्रकरण हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक तेजस्वी अध्याय होता. शिवबाराजांच्या जीवनातील ती आमने-सामनेची पहिलीच लढत होती. या लढाईचा निकाल आपल्यातर्फेच लावून आपली दहशत व कीर्ती वाढविण्याचा व विजापूरला जन्मभर ध्यानात राहील असा धडा देण्याचा शिवबांचा हेतू होता. खान दगा देवो वा न देवो, त्याला जिवंत सोडायचा नाही, हा निश्चय त्यांच्या मनात होता. त्याला अनुसरूनच शिवबाराजे योजना आखीत होते. या योजनेची पूर्व आखणी निदान दोन महिने तरी चालू असावी.



**सदर व केदारेश्वर**

प्रतापगड म्हटलं की डोळ्यासमोर येतं जिथे पन्नाशीतील एका अनुभवी, बलाढ्य, धर्मांध सेनापतीचा सेनासागर तिशीमधील एका तरुणानं साफ बुडवला, ती जागा. या स्थानी पोहोचल्यावर हे सर्व आठवून डोकं आपोआप नतमस्तक होतं आणि ओठातून नकळत शब्द उमटतात, 'जय भवानी, जय शिवाजी' अन् हर हर महादेव! या किल्ल्याला एकदा तरी भेट दिलीच पाहिजे.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
वर्धा रोड, नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल – dilipwandalkargmail.com

●●●

# मु. पो. १०; फुलराणी

*मु.पो.१०; फुलराणी या पुस्तकातील कथेचा परिचय या लेखात करण्यात आला आहे. – संपादक*

या पुस्तकाबाबत जरा गंमतच झाली.

हे पुस्तक पहिल्यांदा हातात घेताना ते उलटे हातात घेतले गेले. त्या मलपृष्ठावर एक फोटो आहे. त्यात प्रसिद्ध साहित्यिक किंवा साहित्यिकांच्या पत्नी असणार असे वाटतच होते. त्यातच या पारधे कुटुंबीयांचा आणि साहित्य सहवासाचा जुना संबंध आहे हे या कुटुंबीयांचे आधीचे पुस्तक वाचलेलं असल्याने आणि तसेही ऐकून माहीत होते. म्हणून कुतूहलाने तो फोटो पाहायला लागलो. अपेक्षेप्रमाणे त्या फोटोत 'Star Cast' होतीच.

पण त्या क्षणापासून आत्तापर्यंत त्या फोटोतील व्यक्तींपेक्षा त्या फोटोचे कॅप्शन माझ्या जास्त लक्षात राहिले आहे. त्या व्यक्तींची नावे न देता या आजी, त्या बाई अशी नावे आहेत त्यात! हे एकदम भावले.

माझे स्वतःचे लहानपण वाडा संस्कृतीत गेले आहे. आज आम्हाला तो वाडा सोडून ५४-५५ वर्षे झाली आहेत. त्यातली अनेक माणसे आता हे जगही सोडून गेली आहेत. पण आजही ते दिवस, ती माणसे यांचा कोणताही संदर्भ आला की त्या व्यक्तींची अधिकृत नावे तोंडात येत नाहीत; येतात ती अमूक आजी, ती तमूक काकू, ती अमक्याची आई ...

अगदी असेच शीर्षक त्या मागच्या पानावरच्या फोटोचे आहे ...

त्या ओढीने पुस्तक एका झटक्यात सुलटे करून वाचायला सुरुवात केली. कारण या आई माझ्या आई सारख्याच असणार ... जिद्दशिखा.. याची पुस्तकाचा पहिला शब्द वाचण्याच्या आधीपासून खात्री होती.

हे पुस्तक सुलटे करताना मनात आले की मराठी पुस्तकांच्या विश्वात आता किंवा सध्या दोन आया गाजत आहेत ...

एक या पुस्तकातील आई आणि दुसरी देवा झिंजाड यांच्या 'एक भाकर तीन चुली' पुस्तकातील आई !

मनात आले.. अशी आई आयुष्यात असली ना की आयुष्याचा 'विनोद' होत नाही.

(तसे आई हा विषय मराठी साहित्यात गाजण्याची परंपरा जुनी आहे. म्हणून सध्या म्हणाले .... साने गुरुजींच्या 'श्यामची आई' ....)

पुस्तकाचे शीर्षक वाचताना अडखळलो. या शीर्षकात दोन शब्द समूह आहेत.

'मु. पो. १०' हा पहिला शब्दसमूह आणि 'फुलराणी' हा एकच शब्द असणारा दुसरा शब्दसमूह.

मी यातल्या कोणत्याच शब्दसमूहामुळे अडखळलो नाही. मी थबकलो ते या दोन शब्दसमूहाच्या मध्ये असणाऱ्या 'अर्धविराम' या चिन्हामुळे.

हे दोन्ही शब्दसमूह हे पारधी कुटुंबियांच्या निवासाचे पत्ते आहेत हे उघड आहेत. पण ते तेवढेच असते तर या दोन शब्दसमूहाच्या मध्ये स्वल्पविराम आला असता; अर्धविराम नाही.

व्याकरणाचे नियम असे सांगतात की अर्धविराम हा पूर्वार्धाच्या पेक्षा वेगळा असणारा उत्तरार्ध दाखवायचा असतो तेव्हा वाक्याच्या मध्ये येतो.

मला नेहमी वाटते की...

स्वल्पविराम दिशा, अनुक्रम सांगतात आणि अर्धविराम स्थिती !

आईच्या जिद्दीमुळे पारधे कुटुंबीय आता मु. पो. १० इथे राहत नसतात तर पारधे आता फुलराणी मध्ये राहतात हा त्या अर्धविरामाचा अर्थ आहे.

मी जर या पुस्तकाचा लेखक - संपादक - प्रकाशक असतो ना तर हा अर्धविराम सगळ्यात जास्त प्रकाशित केला असता. हे माझ्या मनात आले आणि मला वाटले की या पुस्तकाच्या शीर्षकातला फुलराणी हा शब्द खूप सांकेतिक आहे.

पु. ल. देशपांडे यांचे (खरं म्हणजे भक्ती बर्वे यांच्या त्या भूमिकेने अजरामर झालेले) एक गाजलेले नाटक आहे ... 'ती फुलराणी !'

हे पुस्तक आणि ते नाटक या दोन्हीत एक समान शब्द आहे ... फुलराणी !

त्या नाटकात एक गाजलेले स्वगत आहे ... फुलराणी प्रा. अशोक जागीरदारला उद्देशून म्हणते ...

'तुला शिकवेन चांगलाच धडा !'

ती फुलराणी त्या नाटकात हे म्हणते आणि तसे करते.

नाटकात ...

इथे प्रत्यक्ष आयुष्यात, ही फुलराणी जिचे, कागदोपत्री नाव आहे कोंडाबाई लक्ष्मण पारधे, ती साक्षात नियतीला म्हणते...

'तुला शिकवेन चांगलाच धडा !' नुसते म्हणत नाही. प्रत्यक्षात करते.

नाटकात म्हणत नाही ; जित्या जागत्या आयुष्यात करते. त्यामुळे या पारधे कुटुंबियांच्या नुसत्या वास्तव्याच्या जागेचे नाव फुलराणी नाहीये; ते त्यांच्या आईच्या आयुष्याचे नाव आहे.

फुलराणी हा पारधे यांचा निव्वळ भौगोलिक पत्ता नाही; तो त्यांचा भावनिक पत्ता आहे.

हा या पुस्तकाच्या शीर्षकातील 'फुलराणी' या शब्दाचा अर्थ आहे.

मी जर या पुस्तकाचा लेखक - संपादक - प्रकाशक असतो तर मुखपृष्ठावर 'फुलराणी' हा शब्द नक्कीच इतर दुसऱ्या कोणत्याही शब्दापेक्षा वेगळ्या ठळक आकर्षक रंगात, आकारात, स्वरूपात छापला असता.

१६८ पाने आणि २५० रुपये किंमत असणारे, एप्रिल २०२४ मधे पहिली आवृत्ती प्रसिद्ध झालेले, कोंडाबाई लक्ष्मण पारधे यांचे कथन आणि सिद्धार्थ लक्ष्मण पारधे यांचे शब्दांकन असलेले, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ ओलांडून पुढे गेलो आणि पुन्हा गडबडलो.

कारण मुखपृष्ठावर पुस्तकाचे नाव 'मु. पो. १०; फुलराणी' एवढेच.

पण या पहिल्या पानावर 'मु. पो. १०; फुलराणी' याच्या जोडीला अजून एक शब्द येतो... 'साहित्य सहवास' आणि त्याच्या खाली कंसात शब्द येतात ... 'कोंडाबाईची कालोनी.'

पहिल्यांदा हे मी पाहिले ना तेव्हा हे काही मला जरासुद्धा आवडले नाही. म्हणले काय पुस्तकाची प्रूफे वगैरे तपासतात की नाही!

पण मग स्वतःलाच दटावले की ''बाब्या, लक्षात घे या पुस्तकाचे प्रकाशक अशोक कोठावळे यांचे मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस आहे.'' ते अशी गडबड करणार नाहीत.

मग मनात आले की हे म्हणजे आधीच्या बंगल्याचे नूतनीकरण करून नवीन इमारत बांधल्यासारखे झाले ... त्यामुळे १ मालक आणि १-२ भाडेकरू यांच्या जागी आता २०-२१ सदनिकाधारक !

जुन्या बंगल्यात असतात ते मालक आणि भाडेकरू.... मु. पो. १०.

नूतनीकरण झालेल्या इमारतीत असतात ते सदनिका धारक ... साहित्य सहवास.

आपल्या दर्जात झालेली सुधारणा आपल्या स्वतःच्या मनावरही बिंबवावी लागते. म्हणून मग पहिल्या पानावर येते... 'मु. पो. १० ; फुलराणी साहित्य सहवास.'

या दर्जात्मक सुधारणेचे आपण निव्वळ लाभार्थी असतो. त्याचे सारे श्रेय असते 'त्या' व्यक्तीला !

कारण नवीन इमारत हा आपला निव्वळ पत्ता असतो ... पण 'त्या व्यक्ती' साठी असते तिच्या संपूर्ण आयुष्याचे ध्येय.. जिद्दीने पूर्ण करण्याचे... यालाच मिशन म्हणतात.

त्यामुळे त्या प्रक्रियेला आपण मनोमन एक नाव देतो ... ते नाव असते 'ती व्यक्ती' ज्या शब्दाने सतत त्या प्रक्रियेचा उल्लेख करत असते.. ती प्रक्रिया, ते उद्दिष्ट साध्य होईपर्यंत ती व्यक्ती स्वतःला आणि तिच्या घरातल्यांना सतत आठवण करून देत असते... ते नाव घेत... आणि

मग आपणही नकळत उद्दीष्ट साध्य झालेली गोष्ट त्या गोष्टीचा अधिकृत नावाने ओळखत नाही तर ती कारणीभूत व्यक्ती ज्या नावाने त्या ध्येयाला ओळखते त्या नावाने ओळखत राहतो...

आपल्या आयुष्यभर ...

अगदी अशाच अर्थाने या पहिल्या पानावर शब्द येतो ... कोंडाबाईची कालोनी !

मला गंमत वाटली ...

'कोंडाबाईची कालोनी' हे शब्द पहिल्या पानावर कंसामधे येतात.

आपण आपल्या व्यावसायिक-सामाजिक आयुष्यात आपले पासवर्ड सांभाळून ठेवतो तसे आहे हे!

'कोंडाबाईची कालोनी' हा या पुस्तकाचा, पारधे कुटुंबीय यांच्या आयुष्याचा पासवर्ड आहे आणि तो पासवर्ड सांभाळून ठेवायचा म्हणून तो कंसात छापला असावा या पुस्तकाच्या पहिल्या पानावर. पण मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक, प्रकाशक असतो तर मी या पुस्तकांचे शीर्षक ठेवले असते ... 'कालोनी'!

कोंडाबाई यांच्या प्रक्रियेचे कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क असल्यासारखे !

होय. मला माहीत आहे की सिद्धार्थ पारधे यांचे याआधी प्रसिद्ध / प्रकशित झालेल्या पुस्तकाचे नाव 'कॉलनी' आहे.

लक्षात घेऊया ....

सिद्धार्थ पारधे यांची आहे ती 'कॉलनी' आणि कोंडाबाई पारधे यांची आहे ती 'कालोनी'.

'कालोनी' आणि 'कॉलनी' हे एकमेकांचे कारणही आहेत आणि परिणामही! कदाचित, परिमाणही!

असे सगळे वाटण्याचे कारण म्हणजे नंतरच्या अख्ख्या पुस्तकाचा आशय आणि अभिव्यक्ती !

---

दोष लपवला की तो मोठा होतो आणि कबूल केला की नाहीसा होतो.

याचे एक उदाहरण सांगतो. या पुस्तकाच्या निवेदनात एक ओळ आहे. कालोनीच्या नावापेक्षाही मोठी नावे असलेली लोकं ज्या कालोनीत राहतात त्या कालोनीला 'साहित्य सहवास' म्हणतात. म्हणून तर पहिल्या पानावर 'कालोनी' हा शब्द कंसात नसावा ना!

असे संपूर्ण पुस्तकभर वाचत गेले की जाणवतं की अज्ञान, दारिद्र्य यातून बाहेर पडणे हे कोंडाबाईंच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. त्या साध्याला आणि प्रयत्नांचे साध्य, साधन, उद्दिष्ट इतकेच नव्हे तर असणारे अधिष्ठान होते.. कालोनी

म्हणून मी या लेखात आधी म्हणले की मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक, प्रकाशक असतो तर या पुस्तकाचे शीर्षक ठेवले असते .... कालोनी

हे पुस्तक कोंडाबाईंचे निवेदन आहे अशा स्वरूपात येते ...

दि. बा. मोकाशी त्यांचे 'आनंदओवरी' हे पुस्तक कसे कान्होबा निवेदन करत आहेत असे समजून लिहितात तसे आहे हे!

या दोन्ही ठिकाणी ते फक्त निवेदन नाही. ते त्यांचे जगणे आहे. हे जगणे केवळ त्यांचे नाही तर साऱ्या पारधे कुटुंबीय यांचे आहे.

एकापेक्षा जास्त व्यक्ती, एकापेक्षा जास्त वर्षे, एकापेक्षा जास्त अनुभव या सगळ्यांची ती कालोनी आहे.

या पुस्तकात साहित्य सहवासमध्ये राहणाऱ्या अनेक साहित्यिकांचे विविध किस्से आहेत. त्यातल्या एका किश्श्यात कविवर्य विंदा करंदीकर यांनी कोंडाबाईंना सांगितले ...

मी या अर्जावर सही जरूर करतो. पण या अर्जाचा सरकारवर काहीही परिणाम होणार नाही. कारण दगडावर शाई उमटत नसते.

इतर सगळ्यापेक्षा कोंडाबाई वेगळ्या होत्या. त्या दगड नव्हत्या. त्यावर शाई उमटत होती. त्यांची शाई त्यांच्या पुढच्या पिढीवर उमटत होती. कारण ती पुढची पिढीही दगड नव्हती.

ती पुढची पिढी दगड होणार नाही याची पायाभरणी आणि निगराणी कोंडाबाईनी केली.

म्हणून मु. पो. १० हे 'फुलराणी' झालं.

एकच फक्त ...

थोड वेगळं ...

पुस्तकाची सुरुवात कोंडाबाईने होते. पण उत्तरार्ध मात्र सिद्धार्थ पारधे सांगतात. हा उत्तरार्ध या पुस्तकाचा भाग म्हणून न येता जर एक स्वतंत्र पुस्तक किंवा आधीच्या, कॉलनीचा पुढचा भाग म्हणून आला असता तर जास्त उचित झाले असते असे एक वाचक म्हणून नमूद करावेसे वाटते. कारण हे पुस्तक कोंडाबाई आणि फक्त कोंडाबाई असे व्हायला हवे होते असे राहून राहून वाटते.

मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक , प्रकाशक असतो तर असा आग्रह नक्कीच धरला असता.

मु. पो. १०; फुलराणी

**– चन्द्रशेखर टिळक**

सी–४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

•••

(पृष्ठ क्र. २ वरून – **संपादकीय**)

याखेरीज शाळेच्या मुलांसाठी वाचनालय भेट आयोजित करण्यात येते. अशी एक भेट पाहण्याची संधी मला मिळाली. या भेटीत ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची माहिती देण्यात येते. त्याचबरोबर पुस्तके कशी वाचावीत, त्याच्या नोंदी कशा काढाव्यात, वाचलेल्या मजकूराचा सारांश दुसऱ्यांना कसा सांगावा याचेही मार्गदर्शन करण्यात येते.

जागतिक स्तरावर दरवर्षी सर्वात समाधानी लोक कोणत्या देशात राहतात याचे सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणात मागील ८ वर्षे फिनलँडचा पहिला क्रमांक कायम राहिला आहे. याचा अर्थ या देशात समाधानी वृत्तीचे लोक मोठ्या संख्येने राहतात. या समाधानी जीवनाची पायाभरणी देशातील उत्तम अशा शालेय शिक्षणाने केली जाते असे मला वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

## वास्तू तथास्तु

वास्तु शास्त्र बघताना आपल्याला बऱ्याच गोष्टीचा विचार करावा लागतो. वास्तू ही पंचमहाभूते ह्यामुळे बनलेली असते. त्यामुळे तशा दिशा ठरलेल्या आहेत. त्या दिशानुसार आपल्याला घराचे वास्तुशास्त्र ठरविता येते.

वास्तुशास्त्राचा अभ्यास करताना दिशा, उपदिशा ह्या पण बघाव्या लागतात. मुख्य दिशा चार आहेत. तर उपदिशांमध्ये चार वेद सामावलेले आहेत. सर्व सृष्टी ब्रह्म देवानी निर्माण केली असल्याने वास्तुतील ब्रह्म तत्त्वाला महत्त्व दिले जाते. घराचा मध्य भाग ब्रह्म तत्त्वामध्ये येतो.

घर बघताना वास्तू कशी आहे ह्याचा विचार केला जातो. त्या-त्या दिशाप्रमाणे प्रत्येक खोल्यांचे स्थान आहे की नाही, कारण ते जर प्राप्त झाले तर आपल्या घरातील स्पंदने चांगली राहण्यासाठी मदत होते. प्रगतीला चालना मिळते. जसे किचन हे जर आग्नेय दिशेला असेल तर तिथे जेवण चांगले तयार बनले जाते. तसेच स्त्रीचे आरोग्य चांगले राहते. स्त्रीचे आरोग्य चांगले व मन प्रसन्न असेल तर घर चांगले जबाबदारी असते. तिच्यावर पूर्ण घराची जबाबदारी असते.

किचनचा जसा विचार केला तसा इतर खोल्यांच्या बाबतीत विचार करावा लागतो. म्हणजे मास्टर बेडरूम ही नैऋत्येला असावी. देवघर हे ईशान्य भागात असावे. घराचे प्रवेशद्वार, मास्टर बेडरूम, किचन, देवघर ह्या सर्व आपल्या दिशेला वास्तुशास्त्राप्रमाणे असतील तर बऱ्यापैकी आपल्या घरातील स्पंदने चांगली राहण्यासाठी मदत होते. आरोग्य व आर्थिक परिस्थिती तसेच अडथळे येत नाही.

याशिवाय वास्तू घेतल्यावर वास्तुशांती, होम हवन करणे हे पण महत्त्वाचे आहे. म्हणूनच वास्तु तथास्तु म्हटले जाते. क्रमशः...

**सविता करंदीकर**

भ्रमणध्वनी – +९१८३०८८२७५६६

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७२९ व्या संजीवन समाधीचे औचित्य साधून सकाळ NIE आणि सकाळ भक्ती शक्ती व्यासपीठ यांच्या संयोगाने ठाण्यातील सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम शाळेत दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ सोमवार रोजी ज्ञानेश्वरीतील काही अध्यायांचे पठण आयोजित करण्यात आले होते. यावेळेस शाळेतील इयत्ता सातवीतल्या मल्हार भिडे या विद्यार्थ्याने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वेशभूषेत काही अध्यायांचे पठण, त्यांचा अर्थ आणि भावार्थ विद्यार्थ्यांसमोर सादर केले. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या या श्लोकांमध्ये विद्यार्थ्यांचे आचरण कसे असावे, याचे विवेचन केलेले आहे. समस्त विद्यार्थी यावेळेस तल्लीन होऊन हे निरूपण श्रवण करत होते.



तसेच संगीत विभागातील काही विद्यार्थ्यांनी बुक्का, अभंग याचे सादरीकरण केले. विठूनामाच्या जयघोषात या सुंदर अशा भक्तिमय कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल, सकाळ वृत्तपत्राद्वारे शाळेसाठी प्रमाणपत्र देण्यात आले.



तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची यांजकडून श्री संत ज्ञानेश्वर यांचे सुंदर रेखाचित्र असलेली प्रतिमा, ज्ञानेश्वरी आणि परिचय भागवत धर्माचा...ओळख ज्ञानेश्वरीची या धार्मिक पुस्तकांच्या प्रती देऊन शाळेस सन्मानित करण्यात आले.

**शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खास वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन :–**


दिनांक १८ नोव्हेंबर आणि १९ नोव्हेंबर आणि ३ व ४ डिसेंबर रोजी शाळेत इयत्ता ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन

वागण्यात खोटेपणा नसला की, जगण्यात मोठेपणा लवकर मिळवता येतो.

शाळेच्या गार्गी सभागृहात सकाळी ८:३० ते दुपार १२:३० या वेळेत करण्यात आले होते.

हे आरोग्य तपासणी शिबिर प्रसिद्ध बाल-चिकित्सक डॉ. आनंद बेडेकर यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. आरती पराशर, डॉ. अमृता दुर्गे आणि त्यांच्या वैद्यकीय मदतनीसांच्या साहाय्याने घेण्यात आले.





या आरोग्य तपासणी शिबिरांतर्गत विद्यार्थ्यांची उंची, वजन, दंत तपासणी, कान, रक्तदाब तपासणी केली गेली.

हे शिबिर आयोजित करण्यामागे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची प्राथमिक स्वरूपातील माहिती एकत्रित करून, ती माहिती शिक्षण विभागाकडे त्यांच्या नोंदीसाठी सुपूर्द करण्यात येईल.

विद्यार्थ्यांना स्वतःच्या प्राथमिक आरोग्याबद्दल बालवयापासूनच जागरूकता निर्माण व्हावी, त्यांना दैनंदिन आरोग्य, स्वच्छतेचे महत्त्व कळावे, हा या महत्त्वपूर्ण अशा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यामागचा मुख्य उद्देश होता, असे मत बाल-चिकित्सक डॉ. आनंद बेडेकर यांनी मांडले.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

इ.६ वी ब चा स्काऊट गाईड दीक्षांत समारंभ दि. १९ नोव्हेंबर रोजी साजरा झाला. प्रमुख पाहुणे शाळेच्या उपमुख्याध्यापिका बोऱ्हाडे मॅडम होत्या. तसेच स्काऊट मास्तर श्री. तळले, सौ. बोरवणकर, वर्गशिक्षिका सौ. धोत्रे बाई, गाईड कॅप्टन सौ. साधना जोशी हे उपस्थित होते.



'ठाणेवैभव' या वृत्तपत्रातर्फे दीपावली हस्तलिखित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये ठाणे व परिसरातील ५० शाळा व महाविद्यालयांनी यात सहभाग घेतला होता. हस्तलिखितांच्या या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेच्या हस्तलिखिताची 'उत्तम हस्तलिखित' म्हणून निवड झाली. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी 'नरेंद्र बल्लाळ सभागृह' पाचपाखाडी, ठाणे येथे पार पडला. सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र तसेच शाळेला सन्मानचिन्ह असे पारितोषिकाचे स्वरूप आहे

सप्टेंबर महिन्यात घेतल्या गेलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इंग्रजी व गणित विषयाच्या परीक्षांमध्ये सर्व सहभागी विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळाले. सदर परीक्षेत कु. गौरांग विराज चव्हाण ७वी अ यास इंग्रजी इंटरमीडिएट परीक्षेत विभागीय पातळीवर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

कष्ट ही एक अशी चावी आहे जे नशिबात नसलेल्या गोष्टींचे सुद्धा दरवाजे उघडते.

जिल्हा क्रीडा कार्यालय मार्फत घेतल्या जाणाऱ्या १४ वर्षाखालील गटामध्ये आपल्या शाळेचा विद्यार्थी हर्षद घोरड याने कराटेमधे गोल्ड मेडल जिंकले आहे. तसेच १७ वर्षाखालील गटामध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थी कु. अनिकेत कवळे (इ.९वी-अ) कराटेमध्ये त्याला सिल्वर मेडल प्राप्त झाले आहे.




दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन निमित्त 'घर घर संविधान' कार्यक्रम अंतर्गत इ. ६वी व ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने महानगर पालिकेचे शिक्षणाधिकारी, तसेच CRC चे अधिकारी शाळेत उपस्थित होते. या कार्यक्रमातून ७ वी च्या विद्यार्थ्यांनी संविधान जागृती करणारे एक पथनाट्य सादर केले. सर्व विद्यार्थ्यांकडून सामूहिक संविधान उद्देशिका म्हटली गेली. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राष्ट्रीय प्रतीकांचे व चित्रे मांडली गेली. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. कमलाकांत म्हेत्रे, ठाणे महापालिका शिक्षण अधिकारी, ठाणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

महाविद्यालयात एन.ई.पी सेल तर्फे शनिवार, दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी द्वितीय सत्र आणि चतुर्थ सत्रासाठी को-कॅरिक्युलर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वर्कशॉपमध्ये डॉ. प्रियंवदा टोकेकर, सौ. संगिता दीक्षित, सहाय्यक प्राध्यापक शिवाजी नाईक आणि डॉ. श्वेता अहिरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात एकूण २४ शिक्षक सहभागी होते. या कार्यशाळेचा हेतू सत्र २ व ४ साठी प्रभावीपणे को-कॅरीक्युलरचा अभ्यासक्रम राबवणे हा होता.

महाविद्यालयातील मल्टिमिडीया आणि मास कम्युनिकेशन विभागातील १४ विद्यार्थ्यांनी रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे 'महाराष्ट्रातील महिला पत्रकारांचे संमेलन' या कार्यक्रमात सहभाग घेतला. महाराष्ट्रभरातील महिला पत्रकारांना एकत्र आणून त्यांच्या समोरील नव्या आव्हानांवर चर्चा करणे, माध्यम क्षेत्रातील बदल समजून घेणे व अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. महिला पत्रकारांसाठी मार्गदर्शन, व्यावसायिक संवाद आणि मेंटरशिपचे व्यासपीठ निर्माण करणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते.

महाविद्यालयातील मल्टीमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभागाने शैक्षणिक आणि कौशल्य विकसन हा उपक्रम राबवला होता. सदर उपक्रम बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी ११ वाजता कॉन्फरन्स रूम येथे पार पडला. या उपक्रमाचा मुख्य विषय RTA २०२५ - २६ वृत्तपत्राचे दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन असे होते. या उपक्रमाला एकूण १७ विद्यार्थी उपस्थित होते. यापैकी मुलांची उपस्थिती ८ होती व मुलींची संख्या ९ होती. याचबरोबर २ शिक्षिका देखील या उपक्रमामध्ये सहभागी झाल्या होत्या. या उपक्रमाचा मुख्य हेतू उत्सव -

आपणास एकत्र बांधणारे या मूळ संकल्पनेच्या भोवती वेढलेला होता. या विषयाचे प्रकाशन देखील त्याच दिवशी प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. पुढील तृतीय मासिक आवृत्तीचे विषय देखील निवडण्यात आले. परिवर्तनाचे निर्माते हा विषय ठरवण्यात आला.

महाविद्यालयात संविधान दिन (२६ नोव्हेंबर) निमित्त 'भारतीय संविधान' या विषयावर विशेष जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील बिझनेस लॉ, मास कम्युनिकेशन अँड मल्टिमिडिया, अर्थशास्त्र विभाग आणि एन.एस.एस. युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडला. या सत्रासाठी ॲड. नीलम भट या कायदेतज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनाने झाली. मार्गदर्शकांनी संविधान दिनाचे महत्त्व, भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्ये यांवर सखोल प्रकाश टाकला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयीची जाणीव तसेच लोकशाही मूल्यांची समज अधिक दृढ झाली असे म्हणायला हरकत नाही.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१ नोव्हेंबरपासून डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा कार्यभार स्वीकारला.**



**एल.एल.एम. उद्घाटन सोहळा**

दिनांक ६ नोव्हेंबर रोजी एल. एल. एम. च्या सेकंड बॅचचा उद्घाटन सोहळा आणि समुपदेशन कार्यक्रम पार पडला. व्यवसाय कायदा ह्या कोर्स ला २८ विद्यार्थी तर संविधान आणि प्रशासकीय कायदा ह्या कोर्ससाठी १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.



**समुपदेशन केंद्र – विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय दि. १५/११/२०२५**

समुपदेशनावरील व्यावसायिक प्रशिक्षण सत्र मा. श्री. संकेत पवार, व्यावसायिक प्रशिक्षक व मानसशास्त्र प्राध्यापक यांच्या मार्फत घेण्यात आले. या सत्राचा उद्देश अध्यापकवर्ग आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक समुपदेशन कौशल्यांची ओळख करून देणे तसेच विद्यार्थ्यांच्या समस्यांचे संवेदनशीलतेने आकलन करण्यास सक्षम बनवणे हा होता.

**समुपदेशन केंद्र स्थापन करण्याचे महत्त्व आणि उद्दिष्ट**

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयामध्ये समर्पित समुपदेशन केंद्राची स्थापना विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक आणि शैक्षणिक कल्याणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कायद्याच्या अभ्यासक्रमात विद्यार्थी अभ्यासाचा ताण, करिअरची चिंता, वैयक्तिक अडचणी आणि स्पर्धात्मक वातावरण यांचा मोठ्या प्रमाणावर सामना करतात. समुपदेशन केंद्राचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे:

- विद्यार्थ्यांना त्यांचे मुद्दे मांडण्यासाठी सुरक्षित आणि गोपनीय वातावरण उपलब्ध करून देणे.

- विद्यार्थ्यांना ताण, चिंता आणि शैक्षणिक अडचणी प्रभावीपणे हाताळण्यासाठी मदत करणे.
- अभ्यास, वैयक्तिक जीवन आणि करिअर यांच्यात समतोल साधण्यास मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे.
- महाविद्यालयात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे.
- प्रदीर्घकालीन मानसिक समस्यांना आळा घालण्यासाठी वेळेपूर्वी हस्तक्षेप करणे.

अध्यापकवर्ग आणि कर्मचाऱ्यांना मूलभूत समुपदेशन कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करणे म्हणजे विद्यार्थ्यांना सहानुभूतीपूर्ण, निरपेक्ष आणि वेळेवर मदत मिळण्यास मोठी मदत ठरते.

**सत्राचे तपशील**

दिनांक: १५/११/२०२५
वेळ: सायं. ४:३० ते ५:३०
स्थळ: मूट कोर्ट, पहिला मजला

हे प्रशिक्षण सत्र सर्व अध्यापक आणि अशैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडले. सत्रात मूलभूत समुपदेशन तंत्रांची ओळख, विद्यार्थ्यांमधील वर्तनात्मक बदलांचे निरीक्षण, समजून घेऊन ऐकण्याची कौशल्ये, सहानुभूती निर्माण करणे आणि आवश्यकता भासल्यास व्यावसायिक समुपदेशनासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे यासंदर्भात माहिती देण्यात आली.

**सत्रातील प्रमुख मुद्दे**

- शैक्षणिक यशात मानसिक आणि भावनिक आरोग्याचे महत्त्व समजावून घेणे.
- सक्रिय व सहानुभूतीपूर्ण ऐकण्याची तंत्रे आत्मसात करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये आढळणारे ताण किंवा भावनिक अस्वस्थतेची प्रारंभिक चिन्हे ओळखणे.
- खुले संवाद आणि विश्वास निर्माण करण्याच्या पद्धती.
- समुपदेशन प्रक्रियेतील गोपनीयता आणि व्यावसायिकता राखणे.
- अधिक मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन केंद्राकडे योग्यरित्या मार्गदर्शन करणे.

सत्रादरम्यान संसाधन व्यक्तीने हे अधोरेखित केले की प्रशिक्षित अध्यापकवर्ग आणि कर्मचारी विद्यार्थ्यांसाठी आधार देणारे वातावरण तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांचा प्रथम संपर्कबिंदू होऊ शकतात.

**निष्कर्ष :–** हे प्रशिक्षण सत्र अत्यंत उपयुक्त आणि माहितीपूर्ण ठरले. यामुळे समुपदेशन केंद्राच्या कार्यास आधार देण्यासाठी अध्यापकवर्ग आणि कर्मचाऱ्यांचे कौशल्य अधिक बळकट झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कल्याणासाठी महाविद्यालयाची बांधिलकी, प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली अधिक दृढ होते. समुपदेशन केंद्र विद्यार्थी कल्याणासाठी पुढील काळातही विविध कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे आणि जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करत राहील.






महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण (MALSA) आणि शासनाद्वारे (सरकारद्वारे) नवीन फौजदारी कायद्यांवरील प्रदर्शन १९ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित केले होते.






**संविधान दिन २६ नोव्हेंबर २०२५**

विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वे या विषयावर चित्रकला स्पर्धा, संविधानावरील घोषवाक्य लेखन स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक जागरूकता वाढविण्यासाठी आणि सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या सर्व कार्यक्रमाचे प्रभावीपणे समन्वय सहाय्यक प्रा. विनोद वाघ, सहाय्यक प्रा. हेटेल मेशेरी, सहाय्यक प्रा. यतिन पंडित, डॉ. रूपाली जामोडे, सहाय्यक प्रा. कृष्णा कामत, सहाय्यक प्रा. मनोज नाईक, प्रेरणा वसावे सहाय्यक प्रा. चांदणी घोगरे आणि सहाय्यक प्रा. शिवाजी बिबे यांनी केले. प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी सर्व सहभागींचे अभिनंदन केले आणि त्यांना अशा शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रमांमध्ये योगदान देत राहण्यास प्रोत्साहित केले. या स्पर्धेचा उद्देश भारतीय संविधानात अंतर्भूत असलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या मूल्यांवर प्रकाश टाकणे हा होता. विविध क्षेत्रातील विद्यार्थी वर्गांनी उत्साहाने भाग घेतला आणि संविधानिक मूल्यांवर प्रभावी चित्रे सादर केली. सर्जनशीलता, स्पष्टता, विषयाशी संबंधितता आणि मौलिकता या आधारे प्रवेशिकांचे मूल्यांकन करण्यात आले. प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी चित्रकला स्पर्धेत खालील सहभागींना विजेते घोषित केले.

| क्र. | विजेत्यांची नावे | क्रमांक | बक्षीस |
|---|---|---|---|
| १ | पायल गणेश घरत | प्रथम | १००१ रुपये |
| २ | सागर वसंत मुद्शिंगकर | द्वितीय | ५०१ रुपये |
| ३ | प्रियांका शशिकांत सावंत | तृतीय | ३०१ रुपये |

घोषवाक्य स्पर्धेत एकूण ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. संविधानावरील घोषवाक्यांमधून संविधानाची तत्त्वे आणि समकालीन आव्हानांबद्दलची त्यांची समज प्रतिबिंबित होते. सार्थक रावसाहेब गायकर (रु.५०१), घोषवाक्य: ''हातावर हक्क, न्याय उभा राहतो – संविधान एक मुक्त, निष्पक्ष भूमी निर्माण करते!'' आणि प्रियंका शशिकांत सावंत (रु.३०१), घोषवाक्य: ''संविधानाने दिली, धर्मनिरपेक्ष लोकशाही, गणराजाची शान सर्व जगात आमचा भारत महान ।'' घोषवाक्य स्पर्धेत सहाय्यक प्राध्यापक कृष्णा कामत यांची न्यायाधीश

म्हणून नियुक्ती करण्यात आली. घोषवाक्यांमध्ये प्रतिबिंबित झालेल्या सर्जनशीलतेचे आणि खोलीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना संवैधानिक आदर्शांशी जोडण्यात आणि त्यांना ही मूल्ये नाविन्यपूर्ण पद्धतीने व्यक्त करण्यास प्रेरित करण्यात ही स्पर्धा यशस्वी झाली.

भारतीय संविधानाच्या 'अंतर्गत मूलभूत संरचना सिद्धांत' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक जागरूकता वाढवणे तसेच त्यांचे सार्वजनिक भाषण आणि विश्लेषणात्मक कौशल्य सुधारणे हा या स्पर्धेचा उद्देश होता. विद्यार्थ्यांना मूलभूत संरचना सिद्धांताची उत्क्रांती, महत्त्व आणि न्यायालयीन व्याख्या अभ्यासण्यास प्रोत्साहित करण्यात आले. २४ नोव्हेंबर पर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करण्याची मुभा होती. एल एल.बी. अभ्यासक्रमांच्या विविध वर्षांच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत भाषणाने झाली, त्यानंतर सहभागींनी दिलेल्या वेळेत भाषणे सादर केली. सिद्धांताची उत्क्रांती, केशवानंद भारती निकाल, न्यायालयीन पुनरावलोकन, धर्मनिरपेक्षता, संघराज्यवाद आणि संविधानाचे रक्षण करण्यात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका यासारख्या आवश्यक घटनात्मक वैशिष्ट्यांचा समावेश होता. सहभागींचे मूल्यांकन न्यायाधीश ॲड. राजेश पांचाळ आणि ॲड. सागर कासार यांनी आशय आणि कायदेशीर अचूकता, स्पष्टता आणि स्पष्टीकरण, सादरीकरण कौशल्ये, संवैधानिक तत्त्वांची समज, विचारांची मौलिकता यावर केले. त्याच दिवशी न्यायाधीशांच्या पॅनेलने निकाल जाहीर केले. खालील विद्यार्थ्यांना पारितोषके देण्यात आली: प्रथम पारितोषिक: १००१ संजना कुंबर आणि मुकेश तोमर यांना, द्वितीय पारितोषिक: ५०१ अनिकेत जाधव यांना आणि तृतीय पारितोषिक: ३०१ आलिया बिलाल अहमद निर्बान यांना देण्यात आले. सर्व सहभागींना सहभागाचे ई-प्रमाणपत्रे देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा ही एक यशस्वी शैक्षणिक उपक्रम होती ज्याने सार्वजनिक भाषणात आत्मविश्वास वाढवताना मूलभूत संरचना सिद्धांताची विद्यार्थ्यांची समज वाढवली. विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग, वेळेवर संघटन आणि अंतर्दृष्टीपूर्ण निर्णय यामुळे कार्यक्रमाच्या एकूण यशात योगदान मिळाले. या स्पर्धेने संवैधानिक साक्षरतेला चालना दिली आणि ठाणे येथील व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजची शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली.

**२६ नोव्हेंबर संविधान दिन निमित्ताने संविधान प्रस्तावनेचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले.**







**फ्रेशर्स मूट कोर्ट स्पर्धा**

दिनांक: २७ नोव्हेंबर २०२५ स्थळ: मूट कोर्ट हॉल, वि.प्र.मं चे ठाणे विधी महाविद्यालयात फ्रेशर्स मूट कोर्ट स्पर्धा २०२५ ची अंतिम फेरी २७ नोव्हेंबर २०२५ रोजी मूट कोर्ट हॉलमध्ये यशस्वीरित्या पार पडली, ज्यामध्ये प्रथम विधी वर्षाच्या विद्यार्थ्यांनी

उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या प्रेरणादायी स्वागत भाषणाने झाली, ज्यांनी कोर्टरूम प्रॅक्टिसशी लवकर संपर्क साधण्याचे आणि नवोदित कायद्याच्या विद्यार्थ्यांमध्ये वकिली कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. ग्लॅडी परेरा यांनी केले. त्यांनी संशोधन गुणवत्ता, विचारांची स्पष्टता, बोलण्याची पद्धत, कायदेशीर अधिकारांचा वापर आणि एकूणच कोर्टरूम शिष्टाचार यावर सहभागींचे मूल्यांकन केले. कार्यक्रम समन्वयक सहाय्यक प्रा. सीएस यतीन पंडित, सहायक प्रा. डॉ. रूपाली जामोडे त्यांच्या बारकाईने नियोजन, विद्यार्थ्यांशी समन्वय आणि वचनबद्धतेमुळे सर्वांसाठी व्यावसायिक आणि आकर्षक मूट कोर्ट अनुभव सुनिश्चित झाला. प्रत्येक अंतिम स्पर्धकाला त्यांचे युक्तिवाद सादर करण्यासाठी ८ मिनिटे देण्यात आली. सहभागींनी याचिकाकर्ते (P1-P6) आणि प्रतिवादी (R1-R6) यांचे प्रतिनिधित्व केले. अंतिम स्पर्धकांनी उत्कृष्ट तयारी, संरचित लेखी सबमिशन आणि आत्मविश्वासपूर्ण तोंडी वकिली दाखवली. ॲड. ग्लॅडी परेरा यांनी अंतिम स्पर्धकांचे त्यांच्या स्पष्टतेसाठी, संशोधनासाठी आणि संयमासाठी कौतुक केले. फ्रेशर्स मूट कोर्ट स्पर्धा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ ठरली, ज्यामुळे त्यांना त्यांच्या कायद्याच्या प्रवासाच्या सुरुवातीलाच वकिली, कायदेशीर संशोधन आणि कोर्टरूम शिस्त स्वीकारण्यास प्रोत्साहित केले गेले.

निकाल आणि पुरस्कार एकूण कामगिरीच्या आधारे, खालील विजेते घोषित करण्यात आले:

**पहिले पारितोषिक:** दोराईस्वामी पी. शंकरन (R6)

**दुसरे पारितोषिक:** प्राची कोराने (R5) आणि सचिन अहिरे (R3)

**तिसरे पारितोषिक:** ओनिल कुलकर्णी (R2) आणि प्रशांत रघटवान (R3)

**सर्वोत्कृष्ट स्मारक:** दोराईस्वामी पी. शंकरन




**विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी :**

प्रथम विधी वर्ष विद्यार्थिनी पायल होरा हिने लखनौ



विद्यापीठाच्या कायदा विभागाच्या प्रो बोनो क्लबने आयोजित केलेल्या लेख (article) लेखन स्पर्धेत भाग घेतला होता आणि तिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जिंकले आहे.

प्रथम विधी वर्ष विद्यार्थी अमित पाध्ये यांनी अंजुमन-ए-इस्लामच्या बॅरिस्टर ए.आर. अंतुले कॉलेज



ऑफ लॉ, मुंबई आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यांनी सहभागी होण्याचा आणि आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आम्हाला आनंद आहे.



प्रथम विधी वर्ष विद्यार्थिनी आभा तारके ही राष्ट्रीय स्तरावर जिम्नॅस्टिक्सची प्रमाणित न्यायाधीश आहे आणि आम्हाला तिच्या कामगिरीचा खूप अभिमान आहे.



आंतरमहाविद्यालयीन जिल्हास्तरीय कविता लेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावलेल्या प्रथम विधी वर्ष विद्यार्थिनी कु. मृणालिनी पाटील यांचा आम्हाला अभिमान आहे.

प्रथम वर्षाचा विद्यार्थी मयंक कारवारकर आणि तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री. राहुल वेश्विकर यांनी अंजुमन-ए-इस्लामच्या बॅरिस्टर ए.आर. अंतुले कॉलेज ऑफ लॉ, मुंबई यांनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत भाग घेतला आहे. त्यांनी सहभागी होण्याचा आणि आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आम्हाला आनंद आहे.




महाविद्यालयातील तृतीय वर्ष विधी विद्यार्थ्यांनी अंजुमन-ए-इस्लामच्या बॅरिस्टर ए. आर. अंतुले कॉलेज ऑफ लॉ, मुंबई यांनी आयोजित केलेल्या मध्यस्थी स्पर्धेत उपविजेता पुरस्कार जिंकला आहे. सहभागी तृतीय वर्ष विधी विद्यार्थी मिहिर घांगरेकर, सुनील कदम, वेंकटेश अय्यर.



**शिक्षक कर्मचाऱ्यांची उत्कृष्ट कामगिरी**



यु.जी.सी.एम. एम. टी. टी. सी. मुंबई विद्यापीठ येथून सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुपाली जामोडे यांनी २७ ऑक्टोबर ते २२ नोव्हेंबर दरम्यान त्यांचे अभिमुखीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले.



२८ आणि २९ नोव्हेंबर रोजी अमृता इंटरनॅशनल स्कूल कोइम्बतूर येथे आयोजित भारतीय संविधानाचे नवीन परिमाण आणि आव्हाने यावरील राष्ट्रीय परिषदेत डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी Vita to Vote: The Expanding Horizon of Article 21 - Late Recognition of Suffrage and Contemporary challenges या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला.

केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेकरिता आमचे महाविद्यालय परीक्षा केंद्र होते. ३८४ विद्यार्थी ह्या केंद्रावर नेमून देण्यात आले होते. दिनांक ३० नोव्हेंबर रोजी GRT Ex "General Ability Test" ह्या विषयाची परीक्षा पार पडली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ नोव्हेंबर २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी उद्योग - शैक्षणिक संवाद उपक्रमाचा एक भाग म्हणून एमएमएसच्या विद्यार्थ्यांसाठी ब्रिम्सचे माजी विद्यार्थी आणि हाफेल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड येथील पॅन इंडिया प्रोजेक्ट्सच्या एम. आय. सी. इ. इव्हेंट्सचे व्यवस्थापक, तसेच रिलायन्स जिओ वर्ल्ड गार्डन्समध्ये इव्हेंट मॅनेजर म्हणून पूर्वीचा अनुभव असलेले श्री. पंकज व्यास यांच्या अतिथी सत्राचे आयोजन केले.






८ नोव्हेंबर २०२५ : जाहिरात जगतातील दिग्गज व्यक्तिमत्त्व श्री. पियुष पांडे यांना औपचारिक श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाची, 'जाहिरात' या विषयावरील पूर्वार्धकार्यशाळा पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रतिष्ठित पाहुणे आणि समकालीन जाहिरात तज्ज्ञ – श्री. अजय रावल, श्री. गुरप्रीत राय, श्री. ऋषभ श्रीवास्तव आणि श्री. कृष्णराव बुद्ध यांना आमंत्रित करण्यात आले. आधुनिक जाहिरातींच्या गतिशीलतेबद्दल त्यांचे विचार आणि अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.







१० नोव्हेंबर २०२५: डॉ. स्मिता जपे यांनी एमराल्ड प्रकाशनाद्वारे प्रकाशित होणाऱ्या 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ फायनान्शियल अँड इकॉनॉमिक्स पॉलिसी' या स्कोपस अनुक्रमित नियतकालिकांसाठी समीक्षण प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली.

emerald PUBLISHING

Dear SMITA JAPE,

Thank you again for reviewing "DOMESTIC CREDIT EFFECT ON NEW BUSINESS DENSITY IN THE HIGH AND MIDDLE-INCOME COUNTRIES" for *Journal of Financial Economic Policy*. You indicated that you would like to receive recognition for your review on the Web of Science, which you can do now by claiming your review here:

Add your review to your Web of Science researcher profile

Once you've created your researcher profile your review will be verified and added to it. Your anonymity is protected by default but you may be able to reveal additional details of your review if our review policy on the Web of Science allows it.

Please contact us if you have any questions.

१० नोव्हेंबर २०२५ : डॉ. नितीन जोशी यांना बाबासाहेब गावडे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट येथे पीएचडी विद्यार्थ्यांसाठी आरएसी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

**१५ नोव्हेंबर २०२५ : श्री. पियुष पांडे यांना श्रद्धांजली**

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजतर्फे जाहिरात जगतातील दिग्गज व्यक्तिमत्त्व श्री. पियुष पांडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या असाधारण योगदानाचे कौतुक करण्यासाठी, जाहिरात उद्योगातील दोन प्रसिद्ध व्यक्ती – श्री. भरत दाभोळकर आणि श्री. जगदीप कपूर यांना कार्यक्रमासाठी विशेष अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.

डॉ. नितीन जोशी यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि सर्जनशीलता आणि धैर्य हे गुण श्री. पियुष पांडे यांच्या प्रवासाची खऱ्या अर्थाने व्याख्या करतात असे सांगितले.

यानंतर, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी सांगितले की, केवळ १५ दिवसांत संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात आली. त्यांनी अभिमानाने नमूद केले की आमची संस्था पियुष पांडे सरांच्या स्मृतीप्रित्यर्थ महोत्सव आयोजित करणारी भारतातील पहिली संस्था आहे.

श्री. जगदीप कपूर यांनी श्री. पियुष पांडे यांच्यासोबत जवळून काम करण्याचा त्यांचा अनुभव सांगितला. त्यांनी सांगितले की, पूर्वीच्या काळात हिंदीमध्ये जाहिराती क्वचितच तयार केल्या जात असत, परंतु पियुष सरांनी हा नियम मोडला.

त्यांनी पियुष यांचे १२ मंत्र सांगितले, त्यापैकी काही महत्त्वाचे मंत्र अधोरेखित केले:

P- Prerna (Inspiration) प्रेरणा

I - Innovation नवोन्मेष

Y - Yuva Thinking युवा विचार

U - Understanding समज

S - Success Ratio यशाचे प्रमाण

H - Hindi हिंदी

त्यांच्या 'मॉल सर्वांसाठी नाही' या लेखाबद्दल देखील त्यांनी भाष्य केले, ज्यामध्ये ग्राहकांच्या वर्तनावर भर देण्यात आला आहे. त्यांनी सांगितले की, ते दर शनिवारी किरकोळ व्यवहाराचे वैयक्तिकरित्या निरीक्षण करत जे (त्यांच्या मते) मार्केटर्ससाठी एक महत्त्वाची सवय असावी. ग्रामीण आणि शहरी भारताशी जोडणाऱ्या जाहिराती तयार करण्याच्या पियुष सरांच्या क्षमतेचे त्यांनी कौतुक केले, त्यांनी हे सिद्ध केले की हिंदी अनेकदा हृदयाला अधिक शक्तिशालीपणे स्पर्श करते. पियुष पांडे कायमचे ग्राहकांच्या हृदयात राहतील असे मत त्यांनी व्यक्त केले.

श्री. भरत दाभोळकर म्हणाले की, ते ॲडफेस्टमध्ये पियुष सरांना अनेकदा भेटत असत आणि विनोदाने म्हणाले की, ते 'त्यांचा द्वेष करत' कारण ते नेहमीच पुरस्कारांसाठी एक कठीण स्पर्धक होते. त्यांनी स्पष्ट केले की पारंपरिकपणे इंग्रजी जाहिरातींच्या प्रती प्रादेशिक भाषांमध्ये कशा अनुवादित केल्या जातात. परंतु पियुष सरांनी ग्राहकांच्या भाषेत थेट विचार करून खेळ बदलला, त्यांनी स्थानिक भाषेला फॅशनेबल बनवले, साधेपणाने आणि स्टायलिश पद्धतीने कथा सांगितल्या. त्यांनी सांगितले की, निवड समितीवर, पियुष सर हे खूप सरळ आणि प्रामाणिक न्यायाधीश होते, जर जाहिरातीत मेहनत नसेल तर ते कधीही वाईट म्हणण्यास मागेपुढे पाहत नव्हते.

या श्रद्धांजलीचा एक भाग म्हणून आंतर-महाविद्यालयीन जाहिरात स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. हा कार्यक्रम पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आला.

स्पर्धेत सहभागी विविध महाविद्यालयांमधील जाहिराती प्रदर्शित करण्यात आल्या. निकाल खालील-प्रमाणे जाहीर करण्यात आले:

- पहिले स्थान: डेअरी मिल्क जाहिरात - जोशी बेडेकर कॉलेज
- दुसरे स्थान: इको सेफ्टी इअरिंग्जची जाहिरात - जीएनव्हीएस कॉलेज
- तिसरे स्थान: पार्ले जी जाहिरात - डॉ. व्ही. एन. ब्रिम्स

त्यानंतर 'द वर्ल्ड ऑफ मिस्टर पियुष पांडे' या विशेष भागाचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये त्यांचा बालपणापासून ते भारतीय जाहिरातींमध्ये एक अविस्मरणीय नाव बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास चित्रित करण्यात आला व श्री. अजय रावल यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. एच. एस. चीमा यांनी समारोपाचे भाषण केले व कार्यक्रमाची सांगता झाली.




१७ नोव्हेंबर २०२५ : ठाकूर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे त्यांच्या प्राध्यापक निवड प्रक्रियेसाठी डॉ. नितीन जोशी यांना आमंत्रित करण्यात आले.

१८ नोव्हेंबर २०२५ : डॉ. स्मिता जपे यांना 'तेलंगणामध्ये सुधारित तूर जातीच्या अवलंबामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि आर्थिक परताव्यावर होणारा परिणाम' या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे समीक्षण करण्यासाठी जर्नल ऑफ एक्सपेरिमेंटल ग्रिकल्चर इंटरनॅशनलद्वारे आमंत्रित करण्यात आले.

२० नोव्हेंबर २०२५ : डॉ. पल्लवी चांदवासकर व डॉ. स्मिता जपे यांची मुंबई विद्यापीठातर्फे व्यवस्थापन विषयाच्या एका विषयासाठी अध्यक्ष – पेपर सेटर, मॉडरेटर आणि परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

२० नोव्हेंबर २०२५ : डॉ. मयुरा पाटील यांनी १५ ऑगस्ट ते २० नोव्हेंबर या कालावधीत सेंटर फॉर हेरिटेज ऑफ इंटेलिजेंस ट्रॅडिशन ऑफ इंडिया, (CHITI) भरूच गुजरातद्वारे आयोजित अंडरस्टँडिंग इंडियन नॉलेज सिस्टम हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला.


CENTRE FOR HERITAGE OF INTELLIGENCE TRADITIONS OF INDIA (CHITI)

Certificate of Completion

This is to certify that

"Understanding Indian Knowledge Systems"

२३ नोव्हेंबर २०२५: ब्रिम्सचे संचालक डॉ. नितीन जोशी आणि ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांनी इंडियन ऑइल डब्ल्यूएनसी नेव्ही हाफ मॅरेथॉन स्पर्धा २०२५ –'२१ किमी – एअरक्राफ्ट कॅरियर रन' या श्रेणीत सहभाग घेतला.

तर श्री. स्वप्निल पवार यांनी इंडियन ऑइल डब्ल्यूएनसी नेव्ही हाफ मॅरेथॉन २०२५ स्पर्धा – '१० किमी– डिस्ट्रॉयर रन' या श्रेणीत सहभाग घेतला.



२६ नोव्हेंबर २०२५: एमएमएस सेमिस्टर १ – पराशरच्या विद्यार्थ्यांनी सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांच्यासमवेत ज्ञानद्वीप प्रांगणातील मुख्य सर्व्हर रूमला भेट दिली आणि माहिती तंत्रज्ञानातील (आयटी) पायाभूत सुविधांबद्दल माहिती मिळवली आणि व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या विविध आयटी घटकांबद्दल जाणून घेतले. श्री. संजय सपकाळ सर आणि सर्व्हर व्यवस्थापन सदस्यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण सेटअपची माहिती देऊन मौल्यवान मार्गदर्शन केले.




२९ नोव्हेंबर २०२५ : डॉ. कांचन अक्षय यांनी स्कोपस अनुक्रमित 'द इंटरनॅशनल जर्नल ऑफ एज्युकेशनल ऑर्गनायझेशन अँड लीडरशिप' या नियतकालिकासाठीचे समीक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❇ संपर्क ❇**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.